# सुंदर मी होणार

सौ. अरुंधती बापट



ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

कथासंग्रह

# सुंदर मी होणार

लेखिका : अरुंधती बापट

# या मित्रांनो! घेऊन जा! लुटा! लुटा! लुटून न्या!

# सुंदर मी होणार

## हे पुस्तक फ़ुकट नाही

यामागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत.

पण तरीही आम्ही ते वाचकांना विनामूल्य घेऊ देतो.

कारण ई पुस्तक एकदा बनलं की एकजण वाचो वा एक लाख.

आमचं काहीच कमी होत नाही.

उलट आनंद वाढतो, मजा येते.

पण

## तुम्ही ते फ़ुकट का घ्यावं?

तुम्हालाही काही देता येईल.

असे काही द्या ज्याने ई साहित्यच्या लेखकांना, टीमला आणि तुम्हाला आनंद मिळेल

आणि तुमचं काहीच कमी होणार नाही.

तुम्ही आशिर्वाद आणि शुभेच्छा द्या

लेखकांना फ़ोन करून दाद द्या

आपल्या मित्रांचे मेल पत्ते आम्हाला द्या

मित्रांना आमच्याबद्दल मेल आणि Whatsapp करा

ई साहित्यचे फ़ेसबुक पेज, इन्स्टाग्राम, टेलिग्राम यांवर स्वतः जा व इतरांना आमंत्रित करा. सोशल मिडियावर ई साहित्यचा प्रचार करा.

सर्वात बहुमोल अशा तुमच्या सूचना द्या

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत ज्याने लेखकाला व ईसाहित्य टीमला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यास मदत होईल. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे व त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा. अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# सुंदर मी होणार


## लेखिका : अरुंधती अरविंद बापट

१० सावली अपार्टमेंट्स,

प्रभात फिल्म कंपनी मार्ग,

लॉ कॉलेज रस्ता, एरंडवन,

पुणें ४११००४

ph 020 25464804

Mo 9423003528

e-mail - arundhati@bapat.net


मुखपृष्ठ छायाचित्र: सौ मेधा अद्वैत बापट, कल्याण

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

www.esahity.in

esahity@gmail.com

प्रकाशन : ८ मे २०२१

©esahity Pratishthan®2021

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

# लेखिकेचा परिचय



मी सौ अरुंधती अरविंद बापट. पूर्वाश्रमीची विजया बाळकृष्ण ओगले. मानसशास्त्र हा माझ्या विषयात masters degree (MA) घेतली. माझे BA पर्यंतचे शिक्षण नागपूर येथे झाले. मराठी माध्यमातून शिकलेली मी, MA ला इंग्लिश माध्यम घेतल्याने, खूप प्रयत्न करावे लागले. पण अथक प्रयत्नांमुळे मी मेरिट घेऊन पास झाले.

त्याआधीच मी लेखनाला सुरवात केली होती. लिहिण्याची प्रेरणा मला माझी आई – सौ शकुंतला बाळकृष्ण ओगले, हिच्याकडून मिळाली. हे पुस्तक लिहून मी मातृऋणाचा सन्मान करते आहे, असं मला वाटतं. कारण मातृऋण कधी फेडता येईल असं मला वाटत नाही.

पहिला लेख मी बालगुन्हेगारीवर लिहिला होता. त्या लेखाला कॉलेजमध्ये पहिले बक्षीस मिळाले होते. त्यानंतर नागपूरच्या लहानमोठ्या वर्तमानपत्रात मी छोटेमोठे लेख लिहीत असे. नागपूर

आकाशवाणीवरही बालविहारमध्ये माझे अनेक कार्यक्रम होत असत.

लग्नानंतर मात्र माझ्या लिखाणात खंड पडला. साधारणपणे १९७३ ते १९७५ याकाळात मी पुन्हा लेखनाला सुरवात केली अनेक मासिकांमधून माझ्या गोष्टी व कविता छापून येत असत. या काळात मी मा. शांताबाई किर्लोस्करांबरोबर महाराष्ट्र पालक शिक्षक संघाचे त्रैमासिक, " पालक - शिक्षक या मासिकाच्या संपादनाचे काम करीत असे. त्यातून मला प्रेरणा मिळाली. मग मी नापास मुलांच्याकरता एक विशेष वर्ग सुरु केला. मला असं वाटायचं की मुलं अभ्यासात मागे पडतात ती केवळ ती बुद्धीने कमी असतात किंवा अभ्यास करत नाही असं नव्हे. तर त्याच्या मागे इतरही काही कारणं असू शकतात. घरचं वातावरण, खूप लाड, पालकांचं दुर्लक्ष, वर चढवल्यामुळे मागचा अभ्यास कच्चा असणे. मी प्रत्येक मुलाचा अभ्यास करून त्याच्या मागे पाडण्याचे संभाव्य कारण शोधून, त्याच्या पालकांशी चर्चा करीत असे. अशा अनेक मुलांना मी अभ्यासात वर आणले आहे. त्यातून मुलांची वाढ व विकास या बद्दल एक सोपेसे पुस्तक लिहिण्याचा विचार मनात आला. तो विचार मी प्रत्यक्षातही आणला. त्याबद्दल पुन्हा केव्हांतरी.

यानंतर मी लेखन करीत असे, पण ते प्रसिद्ध करण्याकडे माझा कल नव्हता. आज माझ्या या कथा वाचकांपर्यंत पोहोचवतांना मला मनोमन आनंद होतो आहे. पहिल्यांदाच माझ्या कथा वाचकांपर्यंत पोहोचत आहेत, त्या वाचकांच्या पसंतीला उतरतील अशी आशा करते. मी मानसशास्त्र शिकले आहे. या गोष्टींमध्ये माझ्याकडून मानवी मनाच्या निरनिराळया भावनांचं प्रकटीकरण झालेलं आहे.

हे माझं तिसरं पुस्तक. e-साहित्य प्रतिष्ठानमुळेच मला पुस्तक प्रकाशनाची संधी मिळाली. स्वतःला आलेल्या अनुभूती वाचकांपर्यंत पोहोचवता आल्या. अनेक सजग वाचक मला पुस्तक आवडल्याचे कळवतात, तेंव्हा मनाला होणारा आनंद व समाधान अवर्णनीय आहे. परमेश्वर कृपेने यापुढेही अशाच कसदार कथा लिहिण्याची प्रेरणा व संधी मला मिळावी, अशी प्रार्थना.

**अरुंधती अरविंद बापट**

# अर्पणपत्रिका

हे माझं तिसरं पुस्तक मी माझी मुलं, ‘आनंद-आसावरी-अनिरुद्ध ’ यांना अर्पण करते आहे.

या तिघांच्या आधाराशिवाय मी आयुष्यात आज जशी ताठ मानेने उभी आहे, तशी उभी राहू शकले नसते.

# सुंदर मी होणार

# कथानुक्रम

१) सुंदर मी होणार

२) प्राक्तन

३) अखेर नियती नमली

४) निरपराध

# सुंदर मी होणार

( गोष्टं ‘ तिची ’ आणि ‘ त्याची ’ )

पु.लंचं सुंदर मी होणार नाटक सुरेखच. पण त्याहूनही सुंदर आणि सुरेख गोष्ट मी प्रत्यक्ष घडतांना पाहिली आहे. कुठलेही ‘ ती ’ आणि ‘ तो ’ एकत्र आले, अगदी प्रेमानी एकत्र आले तरी संघर्ष हा ठरलेलाच. कधी ‘ ती ’ ची जीत तर कधी ‘ तो ’ची जीत, हेही ठरलेलंच. पण इथे जीत मात्र सदैव ‘ तो ’ चीच होत होती. म्हणजे तो काही फार विचारी किंवा हुशार होता असं नव्हे. पण तो ‘ तो ’ होता नं! तेवढंच जीत व्हायला पुरेसं होतं. ‘ तो ’ असणं हाच त्याचा प्लस पॉईंट होता. मतभेद झाले, निर्णय चुकले, तरी तो सदैव बरोबरच. कारण त्याचं स्टेटस होतं

‘ तो. ’ तो म्हणजे बोटांचा V घेऊनच जन्माला आलेला. म्हणून सगळं त्याच्या मुठीत.

साधा सिनेमाला जायचा विषय घ्या नं; तिला तिचा आवडता सिनेमा कधीच पाहता आला नाही. कारण तिला आवडायचे रोमँटिक हिंदी सिनेमे. ते त्याला अगदी संथ आणि रटाळ वाटायचे. मग या संघर्षात जीत सदैव त्याचीच. कधी जोरात बोलणं नाही,

कधी ओरडणं नाही. सदैव आर्जवी स्वरात बोलणार. या बोलण्यातच गोम होती. आग्रही बोलणं. दुसरा नमेपर्यंत हा आपला आग्रह चालू ठेवणार.

ती आपली साधी संसारी स्त्री; आपल्या घरादारावर प्रेम करणारी, आपली कुठचीही जबाबदारी न टाळणारी. म्हणजे घरातल्या प्रत्येकाच्या मनासारखं वागायची तिची धडपड असायची. घरातली माणसं सुखी झाली, आनंदात असली, की तिचंही मन सुखानी शिगोशीग भरलेलं. आपल्या मनासारखं काहीच होत नाही आहे, याकडे तिचं लक्षच नसायचं. दुसऱ्याच्या आनंदात आनंद मानायचं बाळकडूच जणु तिला पाजण्यात आलं होतं.

प्रत्येक गोष्टीत शेवटचा निर्णय त्याचाच. परिणामतः घरातली सगळी माणसं तिला गृहीत धरायला लागली. ती आपली प्रत्येकाच्या आनंदात आपला आनंद शोधत असायची. मी सगळ्यांना जपते, प्रत्येकाच्या मनासारखं करायचा प्रयत्न करते, सगळ्यांना सुखी ठेवते, त्यामुळे मी सर्वात सुखी आहे, असं तिला वाटायचं. जरी सगळेजण तिला गृहीत धरायला लागले, तरी सगळ्यांनाच तिच्या चांगुलपणाची, तिच्या सोडून देण्याच्या वृत्तीची जाणीव होती. सगळीजणं तिला फार मानत असत. कारण

ही माणसं काही फक्त स्वार्थी नव्हती. सर्व बाजूंनी तिला प्रेम मिळायचं, महत्व मिळायचं, तिच्यावाचून सगळयांचं अडायचं, असा तिचा आणि त्याचा संसार अगदी सुखानी चालला होता.

आपल्या संसारात कशाचंच न्यून नाही, याचा तिला फार आनंद वाटायचा. तिच्या अपेक्षाही फार नसायच्या. असेल ते चालवून घ्यायची, पुरवून घ्यायची तिला सवयच लागली होती. त्यामुळे तिच्यात आणि त्याच्यात संघर्षाची ठिणगी पडण्याचा प्रश्नच कधी उद्भवला नाही. त्याला हवी असलेली प्रत्येक गोष्टं, गरजेच्या त्या त्या क्षणीच त्याला मिळावी, याकरता तिची फार धडपड चालायची. त्याकरता त्याची कौतुक भरली नजरच तिला पुरायची. त्याहून आणखी जास्ती अपेक्षा तरी करायची तरी कशाची! ‘ मज काय कमी या संसारी,’ अशीच तिची गोड समजूत होती. पण आपणही कधीतरी तिचं मन सांभाळावं असं त्याला कधी वाटलं नाही.

दिवस गेले, महिने गेले, वर्षं सुद्धा सरली. मुलं मोठी झाली. त्यांची शिक्षणं संपत आली. होता होता तीही पन्नाशीला कधी पोहोचली, कोणालाच कळलं नाही. तिच्या पन्नासाव्या वाढदिवसाला त्यांनी मोठी जंगी पार्टी दिली. परिचयातले सगळे लोक बोलावले होते. सगळे नातेवाईक, तिच्या माहेरची माणसं.

झाडून सारी मंडळी हजर होती. सगळ्यांनाच ती हवीहवीशी होती नं! किती प्रेम बायकोवर! किती काळजी तिची! भाग्यवान आहे ती! अशीच सगळ्यांची प्रतिक्रिया.

आणि ते खोटंही नव्हतं. ‘ त्या ’ चं खरंच खूप प्रेम होतं तिच्यावर. फक्त तो तिला अर्धांगिनी समजत होता. आपल्या सुखातच तिचं सुख सामावलेलं आहे असं तिच्याप्रमाणे त्यालाही वाटत होत. आपलंच अर्धांग ते. आपण सुखी झालो म्हणजे तेही सुखी होणार. अशी त्याची भाबडी समजूत. ‘ ती ’ म्हणजे एक स्वतंत्र व्यक्ती आहे. तिला तिचं स्वतंत्र व्यक्तिमत्वं आहे, याची तिलाच जाणीव नव्हती. तर ती त्याला तरी कुठून असणार! तिलाही त्याची फिकीर नव्हती. तिच्या संसाराच्या विश्वात ‘ ती ’ अगदी मश्गुल झाली होती, रमून गेली होती.

पण हल्ली कधी कधी काहीतरी वेगळंच घडत होतं. कधीतरी तिची घुसमट होत होती. मनाला नाराजी येत होती. कशाची आहे ही नाराजी? का येतो आहे हा अस्वस्थपणा आपल्याला? तिचं तिलाच कळत नव्हतं. पण काहीतरी चुकत होतं, चुकलं होतं खास. हल्ली कधी कधी तिला फार रिकामं रिकामं वाटत होतं. कंटाळा येत होता. दोन्ही मुलं आता मोठी झाली होती. आईच्या

पदराबाहेरचं विश्व त्यांना खुणावत होतं.. भारल्यासारखी ती त्या विश्वाकडे ओढल्या जात होती.

आईची माया सुंदर आहेच, पण त्या व्यतिरिक्तही अनेक रम्य आणि अनुभवण्याजोग्या गोष्टी आपल्या आयुष्यात पदार्पण करत आहेत याचीही जाणीव त्यांना झाली होती. तारुण्याच्या जोशात त्यांची चाल आता बदलली होती. आईवरचं त्यांचं प्रेम तिळभरही कमी झालं नव्हतं. पण आता त्यांचं विश्व विस्तारात जाणं अटळ होतं. आई मात्र जिथल्या तिथेच राहिली होती.

मुलांची कॉलेजेस, त्यांचे मित्र, त्यांच्या गाड्या, त्यांचे ग्रुप्स, त्यांच्या ट्रिप्स, यातच आता मुलं रमून गेली होती. घराचं सगळं सांभाळायला आई होतीच की. पूर्वी आईला हे कर ते कर म्हणून ऑर्डर सोडणारी मुलं, आता धाबे आणि हॉटेल्स धुंडाळत होती. घराच्या पदार्थांची गोडी कमी होऊन, बाहेरचे नवीन पदार्थ आता त्यांना खुणावत होते. मित्रांच्या सहवासात गाडीवरचा वडापावही अमृताच्या चवीचा लागत होता.

तिनी काहीतरी हौसेनी करावं, आनंदानी सरप्राईझ डिश मुलांसमोर ठेवावी, तर बहुधा ती म्हणत, “आई, आता नको. आम्ही बाहेरून खाऊन आलो आहोत.” किंवा “आता आमच्या ग्रुपचं वैशालीत भेटायचं ठरलं आहे. नंतर खातो.” पण त्यांच्या

वेगवान आयुष्यात तो नंतर कधी उगवतच नसे. ती अगदी खट्टू होऊन जाई. पण स्वतःच स्वतःची समजूत काढत असे; आणि मनाचं समाधान करून घेत असे.

'तो' तर काय स्वानंदीच. स्वतःतच मग्न असलेला. स्वतःला काय हवं तेच करणारा. शिवाय त्याचा सगळं वेळ खाऊन टाकणारा, त्याचा भरभराटीला आलेल्या व्यवसायाचा व्याप. तो एक यशस्वी उद्योजक होता. त्याला वेळ असेल तेंव्हा ते बाहेर जात असत; लॉंग ड्राईव्हलादेखील जात असत. पण ते त्याला वेळ असेल तेंव्हा. तिला हवं असेल तेंव्हा कधीच नाही. कारण तो किती कामात असायचा! शिवाय त्याला वेळ असेल तेंव्हा ते बाहेर जायचेच की! पण कधीतरी तिला काय आणि केंव्हा हवं असतं, याची आपण दाखल घ्यायला होऊ=इ असं त्याला कधी वाटलं नाही. तिनी कधी सांगितलं नाही.

आता तर तो आणखीनच ' बीझी ' झाला होता. व्यवसाय वाढत चालला होता नं!तिचा रिता वेळ मात्र, काही केल्या सरत नसे; आणि मी आता या रिकाम्या वेळाचं काय करु ही गोष्टं तिलाही उमजत नसे. दिवस कोणासाठी थांबत नसतात. ते आपले सरतच असतात. तिचा मात्र दिवस सरता सरत नसे. तिचा बैठेपणा नि त्याबरोबर तिचं वजनही वाढत होतं. तिलाही याची जाणीव होती;

पण या गोष्टी बदलण्यासाठी काय करायला हवं, हे तिला समजत नव्हतं. बाहेर चालायला जायला हवं होतं, पण एकटं फिरायला जायचा तिला कंटाळा येत होता. तिला सोबत हवी होती. आपल्याला कुणाबरोबर तरी sharing हवं आहे, ही गोष्टं तिची तिलाच उमजली नव्हती, तर बाकीच्यांना त्याची काय जाणीव असणार?

अशीच आणखी दोन - पाच वर्षं गेली. मुलांची शिक्षणं झाली पाठोपाठ, त्यांच्या पसंतीच्या जोडीदाराबरोबर त्यांची लग्नही झाली. सुना घरात आल्या. मुलांचं तर नवं जगंच निर्माण झालं होतं; ती मात्र आणखीनच एकटी झाली होती. आईनं आपलं खूप केलं, आता उतारवयात तिला कशाला वेठीला धरायचं? या सद्विचारानी मुलं आता त्यांना हवी असलेली प्रत्येक गोष्टं बायकोकडून करुन घेण्यात धन्यता मानू लागली. आपण आईचा किती विचार करतो, याचं समाधान त्यांना वाटत होतं.

पूर्वी घरात आलेला प्रत्येक मनुष्य तिच्यापर्यंत यायचा कारण तो तिच्याकडेच आलेला असायचा. पण आता कालपरत्वे पाहुणे येण्याचं प्रमाणही कमी झालं. सुनांच्या ओळखीचे, त्यांच्या माहेरचे पाहुणे वाढले. ते तिला, विचारत नव्हते का? तर तसं अजिबात नव्हतं. येणारं मनुष्य आधी तिच्याकडेच येत होतं. पण जुजबी

बोलून, तिला नमस्कार करुन सुनांकडे वळत होतं. त्याही लगबगीनी पाहुण्यांचं स्वागत करत होत्या. त्याबरोबर सासूला काय हवं नको, ह्याकडेही त्या जबाबदारीनी लक्ष ठेवत होत्या. तिला तक्रार करायला जागाच नव्हती. खाणं - पिणं सारं आयतं हातात येत होतं. वाटणीला येत नव्हता तो मनुष्य सहवास; आणि सरता सरत नव्हता तो मनाला आलेला एकटेपणा आणि त्यातून उद्भवणारा मनाचा रितेपणा.

तिनं कधी तसं बोलून दाखवल्यास मुलं - नवरा म्हणायचा, “तू नुसती बसून राहतेस, वाचतेस, त्यापेक्षा काहीतरी करत जा. विणकाम कर, भरतकाम कर, चित्रं काढ, बाहेर जा, म्हणजे तुला कंटाळा येणार नाही.”

आजवर ती जे करत आली होती त्यात ह्यातली कोणतीच गोष्टं नव्हती. पण पूर्वी ती जे करत होती ते आता सुना करत होत्या. वेगळ्या पद्धतींनी का होईना पण घर बरं सांभाळत होत्या. जगरहाटीनुसार ते बरोबरही होतं; तिचीही त्याबाबत काही तक्रार नव्हती. त्यामुळे तिला रितेपण आला होता. आता आपण नवीनच काहीतरी करावं, पण काय करावं हे तिला कळत नव्हतं.

आपण आता या सगळ्यांच्या विश्वातून वर्तुळाबाहेर पडलो आहोत, हे तिला कळलंच नाही. आपण आता नावापुरतेच

त्यांच्यात आहोत हे मान्य करायला तिचं मन धजावत नव्हतं. पण वस्तुस्थिती तीच होती. पूर्वी या सगळ्यांचं विश्व तिच्याभोवतीच तर फिरत असायचं. पण आता त्यांच्या कक्षा बदलल्या होत्या. त्यामुळे ते फिरून तिच्याकडे वळणं शक्य नव्हतं; हे तिला कळून चुकलं होतं.

या सगळ्याचे परिणाम तिच्यावर होत होते. तिच्या मनावर शरीरावर त्याच्या खुणा उमटत होत्या. तिचं वजन बरंच वाढलं होतं. कितीही प्रयत्न करा, ते कमी होत नव्हतं. स्थूलत्वाकडे झुकणारी ती, वयपरत्वे त्या वयाला शोभेशीच दिसत होती. अजूनतरी कुठलाही बेढबपणा तिच्यात आला नव्हता. पण आता पाय भारावले होते.

घरातल्या घरात चालणार तरी किती? त्यामुळे पाऊल उचलायलाच वेळ लागत होता. ती दिवसेंदिवस मंद, संथ बनत चालली होती. पूर्वी लगबगीनं, घाईगर्दीत लवणारं - वाकणारं शरीर आताही काम करतंच होतं; पण अगदी मंदपणानी. तिच्यामध्ये होत असलेले हे बारीक सारीक बदल बघायला कोणालाच वेळ नव्हता. उलट तिला त्रास नको म्हणून घरातल्या नोकर / चाकरांची संख्या वाढली होती. सगळे आता नोकरांवरच जास्ती विसंबून राहत असत.

होता होता तिला सोफ्यावरुन उठायला वेळ लागायला लागला. तिच्या सुस्त विश्वाचा भाग बनायला कुणाला वेळही नव्हता आणि गरजही नव्हती. सगळयांच्या सगळया गरज परस्परच भागवल्या जात होत्या. तिच्यापर्यंत काहीच पोहोचत नव्हतं. रात्री मात्र तिची नातवंडं, आजी गोष्टं - गोष्टं म्हणून तिच्या मागे लागत होती. दिवसातला तेवढाच वेळ चांगला जात होता. बाकी दिवसभर सगळा अंधारच होता तिच्या जीवनात. तिच्या नवऱ्याच्या व्यवसायाचा व्याप दिवसेंदिवस वाढतच चालला होता. तीही कधीकधी त्यात सामील होत असे. पण ते नवऱ्याला गरज वाटेल तेंव्हा. त्याच्या व्यवसायात तिचं असं स्वतंत्र स्थान नव्हतंच.

बघता बघता तिला चालणं अशक्य झालं. वेळ जाण्याकरता ती काहीबाही करायची आता तिनी केलेल्या वस्तूंचं कौतुक तिला फक्त नोकरांकडूनच ऐकायला मिळायचं. तिच्याकडून तयार झालेल्या वस्तू पेटीत जात होत्या. त्या पाहायलाच तर कुणाला वेळ नव्हता. तर त्या वापरणार कोण? बाकी सगळे स्वतःच्या विश्वात दंग. तिच्या कलाकृतींचा आस्वाद घ्यायला कुणीच नव्हतं. ह्याबद्दल ती काही बोलायला गेली की घरातली शांतता भंग होत होती. वादंग माजत होतं. कारण कोणी मुद्दाम तसं वागत नव्हतं.

पण मुद्दाम वेळ काढून तिच्याशी बोलायलाही कोणी येत नव्हतं. सगळे आपल्या व्यापात गुंतून गेले होते. ती मात्र सगळयांमध्येच गुंतून बसली होती. आपापले व्याप सांभाळून ते तिच्याकरता खूप वेळ देऊ शकत नाहीत, ही वस्तुस्थिती तिला कशी पटवून द्यावी हे कोणालाच कळत नव्हतं. पण आता तिची गरज सर्वात मोठी व निकडीनी लक्ष द्यायला हवं, अशी आहे, हे ही कोणी समजून घेत नव्हतं. तशी गरज कोणालाच भासत नव्हती. तिच्याबद्दल सर्वांनाच आस्था होती, पण तिच्याकरता त्यांच्याजवळ वेळ नव्हता आणि आपण सगळे मिळून ही वेळ निभावून नेऊ शकतो, असा विचार कोणालाच सुचला नाही.

तिचं सगळंच, म्हणजे शारीरिक व मानसिक सगळंच बिघडत चाललं होतं. काल सगळया गोष्टींचा कळस झाला होता. सकाळपासून संध्याकाळपर्यंत तिची मुलं, सुना, अगदी नवरासुद्धा, कोणीच तिच्याकडे फिरकलं नव्हतं. रात्री सगळे घरी आले. पण आल्यावर दिवसभराच्या कामामुळे सगळेच दमलेले असावेत. त्यामुळे जेवणी झाल्यावर सगळेच आपापल्या खोल्यांमध्ये आपली हक्काची विश्रांती घ्यायला निघून गेले. ‘ अगं, तू दिवसभर काय केलंस? कशी आहेस? आज आम्ही खूप दमलो आहोत उद्या बोलूया; ’ इतपत तिची जुजबी चौकशी करायला सुद्धा कोणी तिच्याकडे आलं नाही.

झोपायला गेल्यावर तिनी नवऱ्याकडे याबाबत तक्रार केली. तेंव्हा तो डाफरलाच तिच्यावर. म्हणाला, तुला काही करायला नको. नुसती बसून राहतेस, मग कंटाळतेस. -- जरा गुंतव स्वतःला कुठेतरी. तुला अगदी काही करायला नको. मी काय आता सगळं सोडून तुझ्याभोवती रुंजी घालत बसू! ” एवढं रागानी बोलून तो झोपला आणि त्याला झोप लागली सुद्धा. ती टक्क जागीच. असं काय घडतंय? आपण असं सारखं सारखं अस्वस्थ का होतो आहोत? आपलं काय चुकतं आहे? याचाच ती रात्रभर विचार करत बसली. हल्ली नेहमी ती या असल्याच विचारात दंग असायची. पुन्हा या सगळ्याचा तिच्या तब्येतीवर आणखी वाईट परिणाम होत होता. डॉक्टरांकडे जाण्याजोगं फार काही तिला होतही नव्हतं. पण ही कोंडी काही फुटत नव्हती.

दुसऱ्या दिवशी नवरा तिला तिला समजावीत म्हणाला, “ अगं, आपण बाहेर जावं थोडं, चार लोकात मिसळावं, आजवर तू स्वतःचं म्हणून काहीच केलं नाहीस आणि आता काहीतरी वेडेवाकडे विचार करून आमच्याशी वाद घालतेस. त्याचा त्रास होतो आम्हाला सर्वांना. हे ऐकल्यावर तर तिला लाजेने मरुन जावं असं वाटलं. पण ते कुठलं आपल्या हातात! अरेच्या आजवर हे सगळे आपल्यावर अवलंबून होते तोवर आपण सर्वांना हव्याहव्याशा होतो. आता वयानुसार व परिस्थितीनुसार आपण

सगळ्यातून बाजूला झालो, तर आपली अडचण व्हायला लागली लोकांना; आपला त्रास होतो सगळ्यांना.

या विचारांनी तिच्या दुःखात भरच पडली. ती विचार करायला लागली; ‘ अरे, आपल्याला तर किती गोष्टी येत होत्या. आपणही आपल्या अंगभूत हुशारीमुळे बाहेरच्या जगात लोकप्रिय होतो. मग कुठे गेलं ते सगळं? ती विचारांच्या आवर्तात सापडली. विचार करता करता तिच्या लक्षात आलं, की आपल्याला तर नोकरी करायची होती. पण लग्न झाल्यावर आपल्याला सासूने नोकरीची परवानगी दिली नाही. तू नोकरी करून चैन करणार आणि मी पोळ्या लाटत बसू होय? एवढ्या तीव्र शब्दात सासूबाईंनी आपल्या नोकरीला विरोध केला होता.

तरीही आपल्याला वाटत होतं की नवरा आपल्याला नोकरी करायची परवानगी देईल. पण त्याने अगदी गोड शब्दात आपल्याला परवानगी नाकारली. आपल्याला कळलंच नाही कशा आपण त्याच्या गोड शब्दांना भुललो ते! आणि मग ही गोष्टं वारंवार घडत राहिली. आपण काही करतो म्हटलं, की काढलाच त्याने आपला ठेवणीतला गोड आवाज आणि आर्जवी स्वर. आपल्या नवऱ्याने अतिशय प्रेमाssssssने आपल्या प्रत्येक सुचनेला विरोध केला. आपणही त्याचं ऐकत राहिलो. तो आपल्यावर अवलंबून

राहात होता, आपण दिवसभर त्याच्याच तैनातीत राहात होतो. त्याची कौतुक भरली नजर झेलण्यात आपल्याला स्वर्ग सुख होत होतं. या सगळ्यात आपण आपलं स्वतंत्र व्यक्ती म्हणून असलेलं, आपलं अस्तित्वच विसरून गेलो. दुधात साखर विरघळावी त्याप्रमाणे आपण आपल्या संसारात विरून गेलो. आपल्याला स्वतंत्र अस्तित्वच उरलं नाही. आपण बायको, आई, वहिनी, काकू, पुढे आजी सुद्धा झालो; पण या सगळ्यात आपलं ‘ मी ’ शी नातंच उरलं नाही. स्वतःशी संवाद साधण्याचा आपण कधी प्रयत्नच केला नाही. तेवढा वेळच कुठे होता आपल्याला.

आता तिच्या लक्षात आलं की तिच्या नवऱ्यानी म्हणजे ‘तो’ नि तिच्याभोवती प्रेमाऽऽनी कोळ्यासारखं मोठ्ठं थोरलं जाळं विणलं होतं; नि वर्षानुवर्षे ती त्या जाळ्यात गुरफटून गेली होती. आज तिच्याभोवती ते जाळं नव्हतंच. पण अजूनही ती त्या प्रत्यक्षात अस्तित्वात नसलेल्या जाळ्यात अडकून पडली होती. अजूनही तिला त्या जाळ्यातून बाहेर पडत येत नव्हतं. हे लक्षात आल्यावर, तिचा स्वास घुसमटला, शिरा ताणल्या गेल्या, मुठी वळल्या. आज प्रथमच घरातल्यांनी ‘ तो ’ आणि ‘ ती ’ यांच्यातलं प्रचंड युद्ध पाहिलं. तिच्या अपेक्षा आणि बोलणं तद्दन मूर्खपणाचं आहे असंच सगळ्यांना वाटलं.

ती ‘ तो ’ वर जिवाच्या आकांताने ओरडली, “ आता मला बाहेर जायला सांगता? माझं स्वतंत्र अस्तित्वच तुम्ही गोड गोड बोलून संपवलंत; आणि आता मला मी स्वतःचं काही केलं नाही म्हणून हिणवता? मला स्वतःचं काही करायला वेळ आणि वाव दिलात का तुम्ही कधी? उलट मी करत असलेली प्रत्येक गोष्टं तुम्ही बंद पडलीत. आणि आता मला शिकवताय, की स्वतःचं काहीतरी कर म्हणून! ती जोरजोरात ओरडत होती; नवरा अवाक होऊन बघतच राहिला. तिचा आरडा ओरडा संपत नव्हता. ती भानातच नव्हती. तिला कसं थांबवावं हेच त्याला कळेना. आज प्रथमच तो तिचं हे रूप पाहत होता. आज तो आरोपीच्या पिंजऱ्यात उभा होता. आपल्याकडून कळत नकळत तिच्यावर अन्याय झाला आहे, हे अजूनही त्याला पटत नव्हतं. अर्धा तास ती बेभान होऊन ओरडत होती. रागावत होती. ती थांबली तेंव्हा तिच्यातलं बळंच संपलं होतं. तीही विषण्ण होऊन बसून राहिली.

आज उभ्या आयुष्यात पहिल्यांदाच तिनी नवऱ्याला इतकी दूषणं दिली होती. त्याला आरोपीच्या पिंजऱ्यात उभं केलं होतं. तिने केलेला कुठलाही आरोप त्याला मान्यं नसला, तरी त्याला तो खोडातही येत नव्हता. जणू त्याच्याजवळचे शब्दच संपले होते. हळुहळू त्याला एक भीषण सत्य उलगडलं होतं. त्याच्यातल्या ‘मी’ नं तिला गिळून टाकलं होतं - वेढून टाकलं होतं. आता त्या खोल

गर्तेतून बाहेर पडण्याची केविलवाणी धडपड ती करत होती. त्याला यश येत नव्हतं. तिच्यासमोर तो तसाच दिङ्मूढ होऊन उभा होता.

कितीतरी वेळानी ती उठली, उभी राहिली तेंव्हा तिच्या लक्षात आलं की, ' अरे, आज आपले पाय डगमगले नाहीत. आपण एकदम ताठ उभ्या राहिलो. हडबडलो नाही. आपणही दमदार पाऊल पुढे टाकू शकतो. मग ती पाय घट्ट रोवून उभी राहिली. जणू आतापर्यंत मनाच्या गाभाऱ्यात दडून बसलेल्या या 'अन्याय्य गोष्टी,' तिच्या गात्रागात्रात शिरून तिला प्रतिबंध करत होत्या. आता त्यांच्या व 'तो' च्या बंधनातून तिचं मन आणि शरीर सुद्धा स्वतंत्र झालं होतं. तिला हलकं हलकं वाटत होतं. त्याच उन्मादात प्रथमच तिनी आत्मविश्वासानी दमदार पाऊल पुढे टाकलं.

# प्राक्तन

मोठा छान, सुबक संसार होता सुमनचा. कमावणारा निर्व्यसनी नवरा,दोन गोंडस मुलं. मुलगा एक मुलगी. आजूबाजूच्या बायकांसारखं तिला लोकांच्या घरी धुणी / भांडी करायला जावं लागत नसे. आठवड्याला सिनेमा, पंधरा दिवसात एकदा तरी हॉटेलची फेरी व्हायचीच. खरंतर त्या वस्तीत, अनेक संसार असेच असायला काही हरकत नव्हती. फार शिकलेली नव्हेत, पण अंगात हुशारी, आणि हातात कौशल्यं असलेली अनेक माणसं त्या वस्तीत होती. पण सगळयांच्याच संसाराला दारुचं ग्रहण लागलेलं. मग काय गरिबी आणि कष्ट त्यांच्या बायकांच्या जणु पाचवीलाच पुजलेले. सुमनचा नवरा व्यसनी नव्हता; त्यामुळे तिचा संसार सगळ्यात उठून दिसत असे. सुमन होतीही तशीच. अगदी फटकळ. कोणाकडून एक शब्दही ऐकून न घेणारी.

कोणाची दृष्ट लागली न कळे; एक दिवस होत्याच न होतं झालं. सुमनांचा नवरा अचानक अपघातात गेला. सुमनांचा संसार उघड्यावर पडला. सुमनला कसलीच सवय नव्हती. पण थोड्याच दिवसात उपाशी राहण्याची पाळी आपल्या घरादारावर येणार,

याची जाणीव सुमनच्या मनाला होतंच होती. शेवटी नाईलाजानी तिनी एका घरचं काम धरलं. कामाला बाहेर जाण्याची सवय नव्हती, उगाच दहा ठिकाणी हिंडायला नको, म्हणून एकाच घरी दिवसभराचं काम धरलं. सुमन सकाळी आठ ते दुपारी चार, एवढा वेळ बाहेर कामाला जाऊ लागली. मुलांना आई बाहेर जाण्याची सवयच नव्हती. बाप तर मरून गेला. आता आईही दिवसभर दिसेना. ती सैरभैर झाली.

सुमनचा सगळा दिवस कामात जायचा. तेंव्हा तर हातातोंडाशी गाठ पडायची. दोघंही मुलं शाळेतून परत यायच्या आधी सुमन घरी परतत असे. पाठोपाठ मुलंही यायची. मग हसण्या बोलण्याला ऊत यायचा. सगळी घडी जरा नीट बसली आहे असं वाटत होतं. पण ते वरवरचं होतं. मुलं जरा चैनीला चटावलेली होती. वडिलांचा मृत्यू झाला तेंव्हा मुलगा बारा व मुलगी दहा वर्षांची होती. म्हणजे बऱ्यापैकी मोठी होती. त्यांना पूर्वीचं सगळं आठवत होतं. सिनेमा, हॉटेल यांची चव त्यांना माहित होती. त्यांना वाटायचं की त्यांना आईनी महिन्यातून एकदा तरी सिनेमाला न्यावं. हॉटेलात न्यावं.

पण सुमनच्या हिशोबात ते बसत नव्हतं. त्यांना गाडीवर मिळणारा वडापाव सुद्धा चालला असता; पण तेवढा सुद्धा मिळत

नव्हता. कारण नवरा मेल्यानी रस्त्यावर आलेल्या आणि बावरून गेलेल्या सुमनला मुलांचं मन कळलं नाही. पैसा पुरेल कसा नि वाचेल कसा, याचीच सतत विवंचना करणाऱ्या सुमनला फक्त तिच्यावर कोसळलेल्या जबाबदाऱ्या दिसत होत्या. तिला वाटायचं मुलांनी ही बदललेली परिस्थिती जाणून घेऊन आपल्याला साथ द्यावी. ती काही आता लहान नाहीत. त्यांनी आपल्याला समजून घ्यावं.

सुमन सकाळी येतांना स्वयंपाक करून यायची. मुलांची वेळ झाली की मुलं जेवून शाळेत जायची. दोन तीन वर्षं सगळं बरं चाललं होतं. पण जसा मुलगा - राजेश, आठवीत गेला, तशी त्याला वाईट मुलांची संगत लागली. ही गोष्टं सुमनला कळायला काही मार्गच नव्हता. मूलं जेवून वेळेवर शाळेत जात होती. वेळच्या वेळी घरी येत होती. मुलगा जेंव्हा आठवीत नापास झाला तेंव्हा सुमनला धक्का बसला. आजवर तो कधी नापास झाला नव्हता. शांतपणाने तो का नापास झाला याची कारणं शोधून काढून, त्यावर उपाय करणं वगैरे गोष्टी, सुमनच्या पठडीत बसत नव्हत्या. तिनी तिचा सर्व राग राजेशवरचं काढला. सततच्या असमाधानी बेडर झालेल्या मुलानी तिला दुरुत्तरं केली. त्याबरोबर सुमन उसळलीच.

तिनं त्याला अर्धमेला होईपर्यंत बडवलं. मायलेकरांमधली आढी आणखीनच घट्ट झाली. आजूबाजूची लोकं, ह्या सगळ्या गोष्टी बघतच होती. स्वतःशीच हळहळतही होती. पण सुमनला सांगायला कोण जाणार? मांजराच्या गळ्यात घंटा कोण बांधणार? कारण सुमन तिच्या मुलांच्या तक्रारी शांतपणे ऐकून घेण्याची शक्यताच नव्हती.

यानंतर सुमनने मुलाला चुचकारून प्रेमानी, रागानी समजावून देण्याचा खूप प्रयत्न केला. आता तर त्यानी शाळाच सोडून दिली. सुमन काही बोलली की तो तिचं बोलणं शांतपणाने ऐकून घ्यायचा; पण तसं वागायचं मात्र नाही. आता त्याला जेवायला घालण्यापलिकड़े तिचा व त्याचा काही संबंधच उरला नाही. पण राजेश बदलला नाही. इलाज नाही म्हणून आपल्या आईला कामाला जावं लागतं, हे त्याच्या कधी पचनीच पडलं नाही. शेवटी सुमनने त्याचा नादच सोडून दिला. काम सोडून तर चालणार नव्हतं.

आता तिची भिस्त तिच्या मुलीवर स्वप्नावरच होती. मुलगी हुशारही होती. आठवीत तिला सत्तर टक्के गुण मिळाले होते. हे ऐकून सुमनची मालकीणही खुश झाली. म्हणाली, ‘ सुमन तिला दहावी पास होऊ दे; आपण तिला डिप्लोमा इंजिनीअर करुया. मी

तिची फी भरेन. सुमनला बरं वाटलं. ती आणखी मन लावून काम करायला लागली. तिनी मुलीलाही सांगितलं की दहावी पास हो मग तुला डिप्लोमा कोर्सला घालायचं. तीन वर्षात तू डिप्लोमा इंजिनीअर होशील मग आपले दिवस पालटतील.

पण मुलीजवळ इतका वेळही नव्हता. समज तर नव्हतीच नव्हती. गोरी गोमटी स्वप्ना, तरुण वयात आणखीनच आकर्षक दिसत होती. मग मुलांची नजर तिच्यावर न पडती तरच आश्चर्य. पंकज तिचा मित्र. तो रोज तिला गाडीवर वडापाव खायला नेत होता. छोट्यामोठ्या गोष्टी भेट म्हणून देत होता. अनेकदा पंकज आणि ती दुपारच्या सिनेमाला सुद्धा जात होती. आवडण्यासारखंच होतं हे सगळं. सगळं मजेत आणि आईला चोरून करायला जमत असल्यामुळे स्वप्नाही खुश होती. आता ती दहावीत गेली होती. सुमनला स्वप्ना इंजिनिअर बनण्याची स्वप्नं पडायला लागली होती. दहावीत असतांनाच स्वप्नाचं प्रेम-प्रकरण सुरु झालं. तिनी शाळेत जायचं बंद केलं. सर्वात महत्वाचं म्हणजे पंकज मायाशी शारीरिक लगट कधीच करत नव्हता; त्यामुळे मायाचा त्याच्यावर शंभर टक्के विश्वास होता. म्हणून त्यानी पळून जायची कल्पना

काढल्यावर स्वप्ना बिनधास्तपणे त्याच्यावर विश्वास ठेऊन, त्याच्याबरोबर पळून गेली.

अर्थात सुमनला याची काही कल्पनाही आली नाही. ज्या दिवशी स्वप्ना घर सोडून पळून गेली, त्या दिवशी तिला सगळं कळलं. पण आता काय उपयोग होता कळून! दुःखात सुख इतकंच की त्या मुलाच्या घरची माणसं बरी होती. त्यांनी स्वप्नाला घरात ठेऊन घेतलं. स्वप्नाला घरकामाची सवय नव्हती; आणि ते करण्याची इच्छाही नव्हती. तरीही त्याची कुठलीही तक्रार सुमनकडे आली नाही. सुमन मुलांवर फार रागावली होती. त्यांनी तिच्या कष्टांना यश दिल नव्हतं.

सुमन जिथे कामावर होती, ती माणसं मात्र समजूतदार होती. ती सारखी सुमनला सांगायची की, सुमन मुलांचा राग आला तरी त्यांच्यावर खूप रागावू नकोस, म्हणजे ती तुझ्याजवळ राहतील. तुझं ऐकतील. ती देखील एकटी पडली आहेत. त्यांचं तर विश्वच बदलून गेलं आहे. पण परिस्थितीनी सुमनांचा स्वभावच बदलून गेला होता.

पहिले हसरी आणि खेळकर असलेली सुमन परिस्थितीनी आणि मुलांमुळे गंभीर आणि चिडखोर झाली होती. त्यामुळे मुलांचं मन तिला कधी समजून घेता आलं नाही.मुलं आणि ती यांच्यात अंतर पडत गेलं. ते तिला पुन्हा कधीच सांधता आलं नाही.

हळुहळू मुलं उनाड बनत गेली.त्यांना सुमनचा वचक राहिला नाही. आपल्या गरजा भागवून घेण्याचे वेगवेगळे मार्गही त्यांना सापडले. सगळा दिवस बाहेरची कामं करण्यात नि संध्याकाळ घरकाम करण्यात गुंतून गेलेल्या सुमनला मुलं आपल्यापासून दूर चालली आहेत ही गोष्टं लक्षात आली नाही. घडलेल्या गोष्टी सुमनच्या पचनी पडल्या नव्हत्या. पण काळ हे सगळयावरचंच औषध आहे. तसं सुमनने मान्य केल्या नाहीत तरी या गोष्टी ती बदलू शकली नाही. राजेश कुठेतरी कामाला जात होता. पण तिला घरखर्चाला काही पैसे देत नव्हता. काळाच्या ओघात ह्या सगळ्या गोष्टी सुमनच्या अंगवळणी पडल्या. मुलीचं तिच्या सासरी बरं चाललं आहे नि मुलगा रोज निदान तोंड दाखवायला तरी येतो आहे यातच ती आता समाधान मानायला लागली. आणखी समाधान मानायची बाब म्हणजे सुमन आता काहीच विरोध करत नसल्यामुळे, रागवारागवी नव्हती. त्यामुळे राजेश कधी कधी एखादं वाक्यं तिच्याशी बोलत असे.

सगळं असं सुरळीत चाललं असतांना, एक दिवस अचानक तिच्या समाधानाला तडा गेला. एक दिवस राजेश जेवायला घरी आला असतांना अचानकच पोलीस आले आणि खिसेकापूंच्या टोळीतील एक म्हणून त्याला घेऊन गेले. तेंव्हा मात्र सुमन हादरली. सगळ्या गोष्टी किती पुढे गेल्या आहेत आणि कुठल्या दिशेला

चालल्या आहेत हे तिला कळून चुकलं. आता सुमननी अंथरुणच धरलं. पण हातावर पोट असलेल्या माणसाला आजारी पाडण्याचे लाड करून घेणं परवडत नाही. ती पुन्हा कामावर जायला लागली. तिचं दिनचक्र अव्याहत सुरुच होतं. तिनं पंकजला जामिनावर सोडवण्याचा प्रयत्न केला. त्याकरता पैसे खर्च करण्याची तिची तयारी होती. पण पंकजचा एकाच गुन्हा नव्हता. एका लहान मुलाला पळवून नेऊन खंडणी मागण्याच्या गुन्ह्यातही त्याचा सहभाग होता. तिचे प्रयत्न फुकट गेले.

सगळ्या दुःखात सुख इतकाच होतं की स्वप्ना पंकजबरोबरच राहत होती भटकत होती. अधूनमधून सुमनला भेटायला येत होती. चांगल्या खात्यापित्या घरात ती नांदत होती. सुखात होती. आपण तरी याहून काय चांगलं स्थळ तिच्याकरता बघु शकलो असतो, असा विचार करुन सुमन स्वतःचं समाधान करून घेत होती. कारण स्वप्ना चांगल्या तालेवार घरात पडावी; तिची आपल्यासारखी फरपट होऊ नये एवढीच तिची इच्छा होती. शिक्षण असलं काय, नि नसलं काय. तिच्यालेखी या गोष्टीला फारसं महत्व नव्हतं.

काही दिवसांनी राजेश तुरुंगातून सुटून परत आला. आता तो बाहेरही जात नसे. काही काम पण करत नसे. त्याने पैसे देण्याचा तर काही संबंधच नव्हता. तो घरात आपल्या डोळ्यांसमोर आहे

एवढीच गोष्टं सुमनला मनःशांती द्यायला पुरेशी होती. पण ही वादळापूर्वीची शांतता होती. हळुहळू करत राजेशचे मित्र घरी यायला लागले. सुमन कामासाठी घरातून बाहेर पडली की ते घरात येत, ती परत येण्याआधी ते परत जात. सुमन आणि राजेश यांच्यात काही संवादच उरला नव्हता. आपल्या पश्चात कोणीतरी रोज घरी येऊन जातं, हे सुमनला कळत होतं. पण कोण येतं आणि का येतं, हे ती राजेशला विचारु सुद्धा शकली नाही.

तिला आता पैशाची सुद्धा फारशी विवंचना नव्हती. तुझा मुलगा तुला विचारात नाही तेंव्हा तुला तुझ्या म्हातारपणाची तरतूद आत्तापासूनच करायला हवी; तेंव्हा मी सांगते तसे पैसे बँकेत भरायलाच हवे. असं तिच्या मालकिणीनी तिला बजावून सांगितलं. त्यांच्यावर विश्वास असल्यामुळे, सुमनने ते तंतोतंत पाळलं. आतापर्यंत बँकेत तिच्या नावाच्या तीन लाखांच्या FD होत्या. खरतर ही रक्कम काही फार मोठी नाही. पण कामवाल्या बाईनी इतके पैसे जमवणं हीच मुळी विशेष गोष्टं आहे, नाही का?

आता ती राजेशचा विचारच करत नव्हती. तो घरात असेपर्यंत त्याला जेवायला घालणं, एवढाच तिचा आणि त्याचा संबंध उरला होता. मधून मधून स्वप्नाची हालहवाल कळत असे. स्वप्ना आपणहून काही फारशी माहेरी येत नसे. कोणाकडून तरी स्वप्नाला

दिवस राहिले आहेत असं सुमनच्या कानावर आलं. २० / २२ वर्षांची स्वप्ना आता आई होणार होती. नातवंडांच्या आगमनाची चाहूल लागताच, सुमन मोहरून गेली. मागचं सगळं विसरून, ती स्वप्नाच्या सासरी गेली. बरोबर स्वप्नाच्या आवडीचे चार पदार्थ घेऊन गेली. आई आल्याचं पाहून स्वप्नाही आनंदली.

आता सुमनांच्या जगण्याला नवाच अर्थ आला. ती अगदी जोमानी बाळंतपणाच्या तयारीला लागली. मालकिणीच्या सल्ल्याने तिनी बरीचशी तयारी करून ठेवली. स्वप्नाला सातवा महिना लागल्यावर ती तिला आणायला तिच्या सासरी गेली. आता तिला सगळ्या गोष्टी अगदी बैजवार करायच्या होत्या. सुमन स्वप्नाला माहेरी न्यायला आली आहे, हे कळल्यावर सुमनच्या सासूलाही बरं वाटलं. कारण लग्न होऊन सून घरात आली तरी त्याचे काही सोहळे झालेच नव्हते. हुंडा घेणं वगैरे तर दूरच, पण साधे मानपान सुद्धा काही झाले नव्हते. आता सगळं रीतसर होतं आहे म्हणून त्यांना बरं वाटलं. सुमननी तयारी दाखवली नसती, तर त्यांची बाळंतपण करायची तयारी होती. पण होतं आहे ते चांगल्याकरताच म्हणून त्यांनी आनंदानी, सुमनला तिला घेऊन जाण्याची परवानगी दिली.

सुमनला तर स्वप्नाला कुठे ठेऊ आणि कुठे नको असं झालं होतं. तिचा घरधनी गेल्यापासून पहिल्यांदाच हे आनंदाचे दिवस तिच्या वाट्याला आले होते. स्वप्नासाठी तिनी दुधाचा उकाडा लावला होता. रोज पालेभाजी तिच्या जेवणात असेल याची ती काळजी घेत होती. संध्याकाळी मात्र ती स्वप्नाला विचारून तिच्या आवडीचा पदार्थ करुन तिला खायला घालत होती. दर पंधरा दिवसांनी ती स्वप्नाला डॉक्टरांकडे नेत होती. स्वप्नाच्या ओढीनी तिचा जावईही असून मधून येत होता. आई, आई म्हणून तिच्या पुढे पुढे करत होता. सुमनला तर आनंदाची नशाच चढली होती. आपलं सगळं दुःख सुमन विसरून गेली होती. कामाला आल्यावर सुद्धा, मध्ये एक दोनदा ती फोन करून स्वप्नाची चौकशी करत होती.

आता सुमननी चांगली दोन महिन्यांची रजा घेतली. बघता बघता बाळंतपणाचा दिवस आला. संध्याकाळीच स्वप्नाच्या पोटात दुखायला लागलं; लगेच सुमन तिला डॉक्टरांकडे घेऊन गेली. त्या म्हणाल्या आता घरी घेऊन गेलात तरी चालेल. उद्या सकाळपर्यंतचा वेळ सहज जाईल. पण सुमनला कुठलाही धोका पत्करायचा नव्हता. रात्रीत जास्ती त्रास व्हायला लागला, वेळेवर रिक्षा नाही मिळाली, तर काय करायचं? ती म्हणाली, “ तसं नको. आम्ही सगळी तयारी करूनच आलो आहोत. दवाखान्याचं बिल

आजपासूनचं लागलं तरी चालेल." मग डॉक्टरीणबाई काही बोलल्या नाहीत. तसंच झालं. पहाटे पहाटे स्वप्ना बाळंतीण झाली. एका छान गोऱ्यागोमट्या मुलाची आई झाली. बाळाचं वजन, आणि सगळंच छान होतं.

सुमननी लगेच फोन करून स्वप्नाच्या सासरी आणि स्वतःच्या कामाच्या ठिकाणी ही आनंदाची बातमी सांगितली. स्वप्नाचे सासू-सासरे येऊन बाळ पाहून गेले. सुमनांचा जावई तर सतत सुमनबरोबर होताच. स्वप्नाची तब्येत चांगली होती. त्यामुळे तिला दवाखान्यातून तिसऱ्या दिवशीच घरी पाठवलं. स्वप्नाला घेऊन सुमन घरी आली. तिला होत असलेलं जागरण, पडत असलेले कष्ट, कशाकशाचं भान सुमनला नव्हतं. तिचा आनंद ओसंडून वाहात होता.

रोज ती स्वतःच बाळाला आंघोळ घालायची. स्वप्नाचं तेल-पाणीही ती स्वतःच करायची. बाळ दिसामाशी मोठं होत होतं. सुमनच्या निगराणीनी स्वप्नाच्या चेहेऱ्यावर बाळंतिणीचं तेज आलं होतं. तीन महिने कधी सरले ते कळलंच नाही. सुमननी बाळाकरता चांदीचे वाळे, कमरेची साखळी, गळयात सोन्याची जिवतीची टिकली, मनगट्या घेतल्या. स्वप्नाला शालू घेतला. तिच्या सासू/सासऱ्यांचा यथोचित मानपान केला. बाळाचं नाव स्वप्नाच्या

इच्छेप्रमाणे ‘ स्वप्निल ’ ठेवण्यात आलं. टॅक्सीकरून सुमनने स्वप्नाची पाठवणी केली. आणि ती पुन्हा आपल्या कामावर रुजू झाली.

स्वप्नाचा आणि तिचा रोज फोन असायचाच. कामावर आल्यावर सुद्धा आज स्वप्निलनी असं केलं, उद्या त्यानी तसं केलं, याशिवाय दुसरा विषय नसायचा. सुमनला या घराशिवाय कोण होतं? या घरानीच तर तिला आसरा दिला होता. सुमन त्या कुटुंबाचा एक सदस्यच होती जणु. तिच्या आनंदात ते कुटुंबही सामील झालं होतं. त्यांनी सुमनला चांगली भारी सिल्कची साडी घेतली होती. तिच्या बाळाकरता चांदीचा पेला, स्वप्नाकरता खड्यांचा सेट, तिच्या जावयाला आणि राजेशला हजार, हजार रुपये पाकिटात घालून दिले होते. सध्या सुमनच्या आनंदाला पारावार नव्हता; ‘ पण दैवं तिच्याकडे बघून खदाखदा हसत होतं.’

राजेशाचंही आता बरं चाललं होत. पुन्हा कधी त्याला घेऊन जायला पोलीस आले नव्हते. तो रोज कामाला जात होता. घरात काही पैसे देत नव्हता. पण सुमनला त्याची काही गरजही नव्हती. कधीतरी तिच्या मनात राजेशच्या लग्नाचा विचार यायचा, पण त्यांच्यात काही संवादच नसल्यानी त्या विषयाला कधी तोंडच फुटलं नाही. एक दिवस, राजेश एका मुलीला घेऊन आला. मी

हिच्याशी लग्न केलं आहे, नि आता मी इथे राहणार नाही. मी वेगळं घर घेतलं आहे. असं सांगून बायकोला घेऊन निघून गेला. सुमन हिरमुसली. पण करणार काय? दोन चार महिन्यांनी कधीतरी तो एकदा घरी यायचा सुमनला भेटायला. त्यानी कधी सुमनला आपलं घर पाहायला सुद्धा बोलावलं नाही.

तरीही तो आहे, त्याचं घर आहे, साथीला त्याची बायको आहे, या विचारांनी सुमन स्वतःचं समाधान करुन घ्यायची. वर्षाच्या अंतरानी राजेशला दोन मुलं झाली एक मुलगा,एक मुलगी. त्याचा सगळं ओढा त्याच्या सासुरवाडीकडे होता. त्यामुळे त्याच्या संसारातील कुठलंच सुख सुमनच्या वाट्याला आलं नाही. स्वप्नीलच्या सहवासाचं सुख मात्र तिला मिळत होतं.

मधल्या काळात तिनं तिची राहती खोलीही स्वतःच्या नावावर करून घेतली होती. एकूण सगळंच बरं चाललं होत. ते सुख तिच्या अंगावरही दिसायला लागलं होतं. चाळिशीतच सुमन तीन नातवंडांची आजी झाली होती. दोन तीन महिन्यांनी का होईना तिला राजेशच्या मुलांचा सहवासही मिळत होता. देवांनी दिलेल्या या दानावर सुमन खुश होती. पण सुख तिच्या नावावर लिहिलेलेच नसावं. ध्यानीमनी नसतांनाच एक दिवस स्वप्ना अत्यवस्थ असल्याचा फोन आला. सुटी घेऊन सुमन तातडीनी स्वप्नाच्या

सासरी गेली. स्वप्निलच्या पाठीवर स्वप्नाला पुन्हा दिवस राहिले होते. पण तिला दुसरं मूल नको होतं. त्याकरता डॉक्टरांकडे न जाता तिनं एक वैदू गाठला होता. त्याचा औषधांनी गर्भ पडून जाण्याऐवजी, स्वप्नाच अत्यवस्थ झाली होती.

या अवस्थेत स्वप्नाला दवाखान्यात भरती केलं होतं. पण डॉक्टरांच्या प्रयत्नांना यश आलं नाही. स्वप्ना पोटातल्या बाळासह देवाघरी निघून गेली. स्वप्निल मातृ सुखाला पारख झाला. सुमन अगदी वेडीपिशी झाली. त्यात भरीस भर म्हणून सामानाच्या सासरच्यांनी स्वप्निलची जबाबदारी सुमनवरच टाकली. सुमनने स्वप्निलसाठी पैसे देऊ केले. ते त्यांना नको होते.

त्यांना स्वप्निलची जबाबदारीच नको होती. स्वप्निलला सुमनकडे पाठवून दिलं, की पंकजचं दुसरं लग्न करून देता येईल, असा त्यांचा मानस होता. इतक्या छोट्या बाळाची उस्तवार कोण करणार?

त्यांनी सुमनला हो / नाही म्हणायला वावच ठेवला नाही. स्वप्निलला त्यांनी सुमनांकडे आणून सोडला.

आता सुमन त्याच्यात अडकली. त्याला घेऊन ती कामावर कशी जाणार होती? पण दुसरा पर्याय तरी काय होता. शेवटी ती त्याला घेऊन कामावर गेली. पण ती तिला सोडून बसेना.

त्यांनी तिला काहीच काम करू दिलं नाही. पण रोज रोज असं कसं चालणार ?सुमनला काम सोडावं लागणार हे स्पष्ट दिसत होतं. ती अगदी पेचात सापडली होती. पण या समस्येची उकल तिच्या मालकिणीनेच केली.

त्या तिला म्हणाल्या, “ सुमन तू कामाला आलीस तर मला ते हवंच आहे; पण स्वप्निलला घेऊन, तू इथे काय आणि इतर कुठे काय, कामाला कशी जाणार? त्यापेक्षा तुमच्या वस्तीतल्या जवळ जवळ सर्वच बायका कामाला जातात. तू त्यांच्या मुलांसाठी पाळणाघर चालव.”

सुमन म्हणाली, “आमच्या वस्तीत कोण ठेवणार मुलांना पैसे देऊन? ”

त्यावर त्या म्हणाल्या, “ हे बघ, सुरवातीला जरी तुला मुलं नाही मिळाली, तरी आता तुझी काही अन्नान्न दशा नाही आहे. एक दोन महिने तू असेच काढू शकशील. दोन महिन्यात तुझ्याकडे मुलं यायला लागतील.”

सुमनने जरा विचार केला. ती म्हणाली, “ बरं बघते.”

त्यावर त्या म्हणाल्या, “ बघते नाही. लगेच सुरु कर. मी तुला सर्वतोपरी मदत करीन.”

त्याप्रमाणे पुढच्या आठ दिवसात सुमनचं पाळणाघर चालू सुद्धा झालं. पहिले आठ-दहा दिवस सुमन एकटीच स्वप्निलला घेऊन बसलेली असायची. एक दिवस एक बाई आपल्या मुलीला घेऊन आली. दोन दिवस इथे ठेऊन पहाते, आवडलं तर कायमच ठेवीन म्हणाली. सुमन स्वच्छ होती. कामाला वाघ होती. स्वप्निलला खेळायला खेळगडी मिळाला म्हणून स्वप्निल खुश झाला. ती मुलगीही माधुरी - तिचं नाव, आनंदानी राहिली. आज काम करतांना त्या बाईला काहीतरी वेगळंच वाटत होतं. कारण आज मुलीची काळजी नव्हती.

दुपारी चार वाजता ती बाई मुलीला न्यायला आली. मुलगी स्वप्नीलशी खेळण्यात मग्न होती. चारदा चाल म्हटल्यावर नाईलाजाने ती खेळ सोडून आली. मग काय? ती रोजच यायला लागली. यानंतर सुमनने मागे पाहिलंच नाही. दुसऱ्या महिन्यातच सुमनकडे सात-आठ मुलं यायला लागली. इतक्या मुलांची उठबस करतांना सुमन दमून जायची. पण पैसा बरा मिळत होता. काही दिवसांनी जशी मुलांची संख्या वाढली तशी तिनी एक बाई कामाला ठेवली. आता सुमनला बऱ्यापैकी विश्रांती मिळायला लागली. सुमनचं प्राक्तन मात्र सुमनची परीक्षा पाहात होतं.

राजेश पुन्हा एकदा वाईट संगतीला लागला होता. त्यालाही बऱ्यापैकी पैसे मिळत होते. पण मित्रांच्या नादानी त्याला दारुचं व्यसन लागलं होतं. त्यांनी घराजवळच हातभट्टी लावायला सुरवात केली. परिणामतः एक दिवस पोलीस त्याला पकडून घेऊन गेले. त्याला दोन वर्षांची शिक्षा झाली. या धक्क्यांनी त्याची बायको आजारी पडली. सुमननी पुष्कळ प्रयत्न केले. पण ती त्या आजारातून उठलीच नाही. संसार उघड्यावर टाकून ती देवाघरी गेली. त्या दोन्ही मुलांना आपल्या घरी घेऊन येण्यापलीकडे सुमनला काही गत्यंतर उरलं नाही. राजेश कधी तुरुंगात तर कधी बाहेर असतो. तो मुलांकडे कधी ढुंकून सुद्धा पाहात नाही. सुमन मात्र स्वतःच्या नव्हे, पण स्वतःच्या मुलांच्या मुलांची उस्तवार करण्यात अडकली आहे. फक्त आता कामासाठी बाहेर जावं लागत नसल्यामुळे ती तिन्ही मुलांकडे बारीक लक्ष ठेऊन असते. आता नातवंडांना तरी उत्तम शिक्षण द्यायचं असं तिनी मनाशी ठरवलं आहे. यश / अपयश देवच जाणे!

# अखेर नियती नमली

अवंतिकाबाई बळवंतराव देशपांड्यांच्या चैतन्यचं आज लग्नं होतं. चैतन्य हा अवन्तिकाबाईंचा दुसरा मुलगा. दोन मुलं नि माहेरवाशीण म्हणवून घ्यायला एक मुलगी, असं आदर्श कुटुंब होतं त्यांचं. देवानी त्यांना सारं काही भरभरून दिलं होतं. त्या सगळ्या वैभवाचा त्या चवीचवीनं उपभोग घेत होत्या. कशा- -कशाची म्हणून उणीव नव्हती त्यांच्या संसारात.

अवंतिकाबाई एका प्रथितयश व्यावसायिकाची पत्नी होत्या. एक कल्पक इंजिनिअर म्हणून त्यांच्या यजमानांचा नावलौकिक होता. शहरातल्या सर्वोत्तम भागात त्यांचा मोठा थोरला बंगला होता. बंगल्याभोवती सुंदर बागबगीचा होता. अवन्तिकाबाईंना सगळ्याची हौस होती, बागेचीही बरीच माहिती होती. माळय़ाकडून त्या सगळं हवं तसं करून घेत असत. त्यांची फुललेली बाग हा त्यांच्या अभिमानाचा विषय होता. तसा बऱ्याच

गोष्टींचा अभिमान (थोडा गर्वच म्हणानात ना ) त्यांना होता. अगदी आपल्याला दोन मुलं आणि एकुलती एक मुलगी आहे याचा सुद्धा.

त्यांचा शब्द झेलायला घरात भरपूर नोकर चाकर तर होते. त्यांच्या कंपनीत काम करणाऱ्यांचे क्वार्टर्सही

शेजारालाच होते. तिथे त्यांच्या कृपाछत्राखाली राहणारे साधेसुधे लोकही आनंदानी त्यांचा शब्द झेलायला सदैव तयार असत. कारण त्यांना आपल्या मालक मालकीणीबद्दल आदर नि जिव्हाळा होता. अवन्तिकाबाईंनी काही म्हणायचाच अवकाश की पेंडश्यांची कुसुम, काळयांची शशिकला नि आणखीही कोणी कोणी त्यांच्याकडे आपणहून हजर व्हायच्या, नि अवंतिकाबाईंची कामं अलगद होऊन जायची. ह्यात कोणतीही जुलूम जबरदस्ती नव्हती; हा सारा खुषीचाच मामला होता, कारण अवंतिकाबाई व बळवंतराव यांच्याबद्दल लोकांच्या मनात प्रेमयुक्त आदर होता.

आज त्यांच्या सुखी आणि संपन्न संसारावर सोनेरी कळस चढणार होता. मोठ्या मुलाचं, मकरंदचं लग्नं होऊन दोन वर्षं झाली होती. मधुराणी, त्यांची पहिली वहिली सून, आज प्रत्येक गोष्टीत जातीनी लक्षं घालीत होती. जबाबदारीनी प्रत्येक गोष्टं नीट होतेय

की नाही ते बघत होती. मधुराणी एका नामवंत डॉक्टरांची, डॉ. परांजप्यांची मुलगी. अवंतिकाबाईंना ती त्यांच्या एका मैत्रिणीच्या मुलीच्या लग्नात दिसली; आणि त्यांच्या मनावर तिची जबरदस्त मोहिनी पडली. यजमानांना सांगून त्यांनी त्यांच्या मोठ्या मुलासाठी मकरंदसाठी तिला रीतसर मागणीच घातली.

डॉ परांजपे हे स्वत:ही एक कुशल डॉक्टर म्हणून प्रसिद्ध होते. समाजात त्यांना भरपूर प्रतिष्ठा होती. तरीही त्यांच्या मुलीला - मधुराला कारखानदार देशपांड्यांच्याकडून मागणी आली, या गोष्टीनी अख्खं घरंच हरखून गेलं होतं. तरीही डॉक्टरांनी मधुराला “तिची संमती आहे का?” असं विचारलं. तिनं नाही म्हणावं असं उणं दुणं त्या स्थळात काही नव्हतंच मुळी. नाही म्हणायला मकरंद नुसता B A होता. पण त्याला कुठे नोकरी मिळवायला जायचं होतं. तो आत्ताच वडिलांबरोबर कारखान्यात जात होता; नि कारखान्यातल्या सर्वांनीच त्याला छोटे मालक म्हणून मान्यताही दिली होती. बघता बघता परांजप्यांची मधुरा मकरन्दची मधुराणी झालीही. पहिली वाहिली सून, शिवाय अवंतिकाबाईंच्या खास पसंतीची, म्हणून तिच्या सासऱ्यांनी, बलवन्तरावांनी भर मांडवात मकरन्दला सांगितलं की तिच्या नावात फक्त ‘णी’ वाढव; नि

मकरन्दनीही वडिलांच्या शब्दाचा मान राखत, मोठ्या खुषीनी आपल्या नव्या नवेल्या गृहस्वामिनीचं नांव मधुराणी ठेवून तिला राज्ञीपद प्राप्त करून दिलं होतं. मधुराणीच्या नावातच माधुर्य होतं असं नाही तर तिच्या वागण्या बोलण्यातही माधुर्य होतं. कंपनीच्या आवारातल्या लोकांना तर मधुराणी एक आदर्श सून वाटायची.

अवंतिकाबाईंची मुलगी - सुखदानी मात्रं शिक्षणात गती दाखवत MBA केलं होतं. गावातल्याच एका प्रतिष्ठित व्यावसायिकाची ती पत्नी होती. तिचे पती श्री विवेक करंदीकर, यांच्या कपड्याच्या ३-४ गिरण्या गावातच होत्या. त्यांच्या कंपन्यांमध्ये जवळजवळ २ ते २.५ हजार माणसं काम करीत असत. एकूण करंदीकरांचं खटलंचं मोठं होतं. सुखदा तिच्या संसारात आणि कंपनीच्या कामात अगदी रमून गेली होती. तिचे सासरे तिला कौतुकानी “ दुहिते - सुखदे “ अशा जोड-नांवानीच हाक मारीत असत. कारण सुखदाचं वागणंच तसं आंखीव - रेखीव असायचं. कुणालाही न दुखावता कसं वागायचं हे सुखादाकडून शिकावं असं तिच्या सासूबाई सुद्धा म्हणायच्या. अशी ही दोन्ही घराण्यांच्या नांवलौकिकात भर घालणारी सुखदा तर अवंतिकाबाईंचा मानबिंदू होती.

अशा या सुखादेच्या धाकट्या भावाचं, चैतन्यचं आज लग्नं होतं. पैठणी नेसलेली, दागदागिन्यांनी मढलेली,सुखदा करवली म्हणून साऱ्या मांडवभर आल्यागेल्यांची वास्तपुस्त करीत सगळ्यांची दखल घेत होती. आजचा विवाह अत्यंत थाटामाटानी साजरा होत होता. अशा या वैभवसंपन्न घरात आज अवंतिकाबाईंच्या दुसऱ्या सुनेचं - पौर्णिमेचं आगमन झालं नि जणु सोनिया सुगंधु आला. आज अवंतिकाबाईंच्या जबाबदाऱ्यांची पूतर्ता झाली होती.

घर तसं खानदानीच! घरात दोन दोन सुना नांदत असूनही नाखुषीचा - नाराजीचा सूर कधी घराबाहेर गेला नाही; हे अवन्तिकाबाईंच्या सांसारिक यशाचं गमक मानता येईल. बघता बघता मकरंदला दोन मुलं झाली. अमोल आणि अजय यांच्या बाललीलांमध्ये अवंतिकाबाई अगदी रमून गेल्या. संसार प्रवाह रुंदावत पण खळखळत वाहत होता.

“ मज काय कमी या संसारी ”असं सुरेल गीत गात अवंतिकाबाई जीवनाचं भरजरी वस्त्र विणीत होत्या. पण या भरजरी वस्त्राची जर मात्रं जरा जास्तीच बोचणारी होती.

अवंतिकाबाई तशा वागायला बोलायला चांगल्या होत्या. स्वत:चा आब राखून वागायचं कसब त्यांच्याकडे होतं. पण स्वत:बरोबर लोकांचाही आब राखणं गरजेचं, असतं याची फारशी जाणीव त्यांच्यापाशी नव्हती ; आणि तशी जाणीव निर्माण होण्याची कपर्दिकही शक्यता नव्हती. कारण या त्यांच्या वैभावयुक्त साम्राज्यावर त्यांची अनियंत्रित सत्ता होती. त्यांना विरोध करणारं नव्हतंच कोणी! बळवंतराव त्यांच्या व्यवसायात आकंठ बुडालेले . दोन्ही मुलं आज्ञाधारक या सदरात मोडणारी; आणि सासर - माहेरी कौतुकात न्हात असलेली मुलगी; या सगळ्यात विरोध हा शब्द म्हणजे सुद्धा विरोधाभासच. भोवतालचा सारा लवाजमा त्यांच्याच कृपाछत्राखाली नांदणारा; शिवाय त्यांच्या सुखदु:खाची -अडल्यानडल्याची जाण अवंतिकाबाई ठेवीत असतंच. मग त्यांना विरोध करायला उरलं तरी कोण? आणि आपण केव्हढ्या उच्च स्थानावर आहोत याची पुरेपूर जाणीव अवन्तिकाबाईंना होतीच ना?

सुनांचे सणावर, लेकीची आणि मोठ्या सुनेची बाळंतपणं, नातवंडांचं, आगमन, त्यांची बारशी, वाढदिवस या धामधुमीत ७ /

८ वर्षं कशी निघून गेली ते कुणाला कळलं सुद्धा नाही. नियती येऊ घातलेल्या वादळाचे इशारे देत होती; पण त्याकडे लक्ष द्यायला वेळ कुणाला होता!

खरं तर कंपनीचं व्यवस्थापन आता बळवंतरावांकडून हळूहळू मुलांच्या हातात जायला हवं होतं. काहीतरी चुकत होतं खरं! मकरंद आणि चैतन्य दोघंही व्यवस्थापन कौशल्यात तितकेसे निपुण नव्हते, हे आता जाणवायला लागलं होतं. त्याकरता काय करायला हवं, ते उमजत नव्हतं. कामगार वर्गाचं मन सांभाळून त्यांच्याकडून योग्यं रीतीनी काम करून घेण्याचं कसब दोघांजवळही नव्हतं. नि वयामुळे पूर्वीसारखा बळवंतरावांचा " एकछत्री " कारभारही चालू शकत नव्हता. मुलांच्या मदतीची बळवंतरावांना गरजच होती. पण मुलांना मात्र आता बळवंतरावांचा हस्तक्षेप नको होता.

खेदाची गोष्ट म्हणजे मुलांना आपली अडचण होते आहे ही गोष्टं बळवंतरावांच्या कधीच लक्षात आली होती. पण मुलाचं व्यवस्थापन कौशल्यं त्यांच्या कसोटीला उतरत नव्हतं; त्यामुळे सगळे व्यवहार मुलांच्या हाती सोपवायला त्यांचं मन तयार होत

नव्हतं. आपण आता निवृत्ती स्वीकारायला हवी ही गोष्टं मनाला पटली, तरी व्यवहारात: ते निवृत्ती स्वीकारु शकत नव्हते. तसं करण्याने होणारा भविष्यातला विनाश त्यांच्या डोळ्यांना आताच दिसत होता. पण त्यावर इलाज काय ते त्यांना उमजत नव्हतं.

बरं हे अवघड जागचं दुखणं! सांगणार तरी कोणाला? त्यांनी मुलांशी बोलायचं प्रयत्न केला; पण मुलांना त्यांचे विचार मागासलेले वाटले. मुलं सर्व व्यवहार हाती घ्यायला अगदी आसुसलेली होती. शिवाय कोणाचा सल्ला घेऊ म्हटलं, तर ते मुलांच्या कानापर्यंत जाणारच होतं. बळवंतराव वाईट रीतीने कोंडीत सापडले होते. त्यांच्या मनावरचा ताण दिवसेंदिवस वाढतच चालला होता. त्यातच घरातही काहीतरी बिनसतंय, खदखदतंय याची चाहूल त्यांना लागली होती. खरंतर आपल्या दोन्हीही सुना समजुतदार आहेत, असं त्यांचं मत होतं. आता ८ / १० वर्षांनंतर त्यांनाही बऱ्यापैकी स्वातंत्र्य द्यायला हवं असंही त्याचं मत होतं. पण अवंतिकाबाई तसं करणार नाहीत याची त्यांना खात्रीच होती. त्यांनी एकदा अवन्तिकाबाईंशी बोलायचं प्रयत्न केला, पण ती बोलणी भलतीकडेच गेली, त्या बोलण्याचा काहीच उपयोग झाला नाही.

त्यांच्या धाकट्या चैतन्यचं लग्नं होऊन १० वर्षं झाली तरी अजून त्याच्याकडून नातवंडाचं आगमन झालं नव्हतं. अवन्तिकाबाईंच्या मनातून पौर्णिमा पूर्णपणे उतरली होती. चैतन्यचं दुसरं लग्नं करून द्यावं,असले रानटी विचार त्यांच्या मनात घोंघावत होते. ही गोष्टं सुद्धा त्यांनी बळवंतरावांच्या कानावर घातली होती. पण बलवंतरावांना ती मान्य नव्हती. त्यामुळे अवन्तिकाबाईंचा नाईलाज झाला होता.

पौर्णिमेची संपूर्ण तपासणी डॉ परांजप्यांच्या दवाखान्यात केली होती; तिच्यात कुठलाही दोष नव्हता. पौर्णिमेच्या वडिलांनी आता चैतन्यचीही तपासणी करून घ्यावी असं हळूच सुचवलं होतं; पण त्याला अवन्तिकाबाईंची तयारी नव्हती. “ पुरुषांच्यात का कुठे दोष असतो? ” असं त्यांचं ठाम मत होतं; आणि चैतन्यच्या अंगात आईविरुद्ध जाण्याची धमक नव्हती. त्यामुळे कितीही पटत असलं तरी तो दवाखान्यात जाऊन स्वत:ची तपासणी करून घेऊ शकत नव्हता. आईचा राग त्याला माहीत होता; त्यामुळे तो याबाबतीत आईशी बोलायला धजत नव्हता. त्यामुळेच त्या एकमेकांवर

अतिशय प्रेम करणाऱ्या जोडप्यामध्ये आता दुरावा निर्माण झाला होता.

इथंच खरंतर कुरबुरीला सुरवात झाली होती. तपासणी करून पुढचा काहीतरी मार्ग काढावा असं पौर्णिमेला वाटत होतं. चैतन्यमध्ये दोष आहे असं निघालं असतं, तरी सरळ मनानी ते सत्य स्वीकारण्याची पौर्णिमेच्या मनाची तयारी होती. आधुनिक वैद्यकीय उपचार करायची किंवा मूल दत्तक घेण्याची तिच्य मनाची तयारी होती. कारण ही गोष्ट देवदत्त आहे, असा दोष आपल्यातही निघू शकला असता, हे तिला माहीत होतं. पण तिच्या या व्यावहारिक विचारांना अवंतिकाबाईंच्या लेखी काहीच किंमत नव्हती. घरातला मोकळेपणा नाहीसा झाला होता.

बळवंतरावांच्या नजरेला पौर्णिमेची होणारी कुचंबणा दिसत होती. पण त्यावरचा इलाज त्यांच्या हातात नव्हता. दोन्ही बाजूंचे ताणतणाव बळवंतरावांना सहन झाले नाहीत. त्याचा व्हायचा तोच परिणाम झाला; आणि त्यांना हृदयविकाराचा पहिला झटका आला. अवन्तिकाबाईंच्या अनभिषिक्त साम्राज्याला पहिला तडा गेला; आणि जणु नियती आणि अवंतिकाबाई यांच्यात हार /

जीतीचा खेळच सुरु झाला. नियतीनी त्यांना धक्क्यावर धक्के दिले पण अवंतिकाबाई, नमल्या नाहीत.

आता मकरंद आणि चैतन्य नियमितपणे कंपनीत जाऊ लागले. पण तिथल्या घडी बसलेल्या व्यवस्थापनाशी जुळवून घेणं त्यांना जमेना. आतापर्यंत बळवंतराव स्वत: हजर असल्यामुळे हे विरोध झाकले जात होते; ते आता राजरोस उघड होऊ लागले. कंपनीतली अशांतता कळत नकळत वाढत होती. स्वत:च्या आत्मसन्मानाच्या विळख्यात अडकलेले मकरंद आणि चैतन्य, प्रस्थापित व्यवस्थापनाला जुमानीतनासे झाले -- आणि कंपनीत कधीही बोलल्या न गेलेली संपाची भाषा बोलली जाऊ लागली. गोष्टी इतक्या हाताबाहेर गेल्या की कामगारांच्या मनातला बळवंतरावांबद्दलचा प्रेमादर ही संपाची भाषा थांबवू शकला नाही.

या सगळ्या गदारोळामागचं कारण व उपाय समजण्याची कूवत मधुराणीमध्ये होती. ती ही दुरून दुरून का होईना पण बळवंतराव कारखान्याचं व्यवस्थापन कसं करतात ते चौकस नजरेनी टिपत होती. त्यामुळे कंपनीत अशांतता माजून त्याचा उत्पादनावर परिणाम होतो आहे असं कानावर आलं, तेव्हां तिने “

मीही रोज कंपनीत येते आपण सर्वजण मिळून या आपत्तीला तोंड देऊया, “ असं सुचावताच मोठ्ठा स्फोट झाला.

“आमच्या पुरुषांनी अजून बांगड्या भरल्या नाहीत हातात; तुमची काय अक्कल आहे ती स्वत:पुरतीच मर्यादित ठेवा; ती कारखान्यात किंवा घरात चालविण्याची गरज नाहीये. माझी मुलं कारखाना चालवायला नि मी स्वत: घर चालवायला अगदी समर्थ आहोत.” असं अवन्तिकाबाईंनी सुनांना अगदी ठणकावून सांगितलं; नि तो विषय तिथेच संपला. मर्यादेत वागणाऱ्या सुना मनात असुनही पुढे काही बोलल्या नाहीत. पण यातून आपण काही शिकायला हवं आहे, असं अवंतिकाबाईंना वाटलं नाही. काळ कुठे चालला आहे, याच त्यांना भानच नव्हतं. नियती त्यांना काही सांगू पाहत होती, पण ते समजून त्यावर विचार करायची गरज अवंतिकाबाईंना नव्हतीच.

इकडून तिकडून, चार वेळा जेंव्हा पौर्णिमेच्या कानावर चैतन्यच्या दुसऱ्या लग्नाची गोष्टं आली, नि आपलं अस्तित्व हाच त्यातला अडथळा आहे, हे ही तिने ऐकलं; तेंव्हा तिनी चैतन्यला “या बाबतीत तुझं काय मत आहे?” असं सरळच विचारलं.

आईबाबांच्या सांगण्याप्रमाणे वागतांना स्वत: स्वतंत्रपणे विचार करायचा असतो, आपली स्वत:ची काहीतरी ठाम मतं असायला हवीत, याची जाणीवच त्याला नव्हती. आपल्या संसारातले निर्णय आपण स्वत: घ्यायला हवेत हे त्याच्या गावीही नव्हतं. त्यामुळे त्यांनी काहीतरी गुळमुळीत उत्तर दिलं. परिणामत: पौर्णिमा माहेरी निघून गेली; पुढच्या पंधरा दिवसात तिची घटस्फोटाची नोटीसही आली. कारण ह्या पंधरा दिवसात चैतन्यने तिला भेटण्याचा काहीसुद्धा प्रयत्न् केला नाही.

अवंतिकाबाईंना तर सुंठीवाचून खोकला गेला असंच वाटलं. त्यामुळे त्यांनी तिची दखलच घेतली नाही. आईने काही सांगितल्याशिवाय चैतन्य काहीच करत नसे. त्याला पौर्णिमेला भेटायची, घरी परत बोलावण्याची फार इच्छा होत होती; कारण पौर्णिमेत काही दोष नाहीय.हे त्याला पटत होतं. दोष असला तर तो आपल्यातच असणार, पण आपलं न्यून उघडं पडू नये म्हणून केवळ आपली आई आपली टेस्ट करायला विरोध करते; हे त्याला चांगलंच समजत होतं; आणि आता आपण बोललो नाही तर आपला संसार मोडल्यात जमा आहे हे ही त्याला कळत होतं. पण हे आईला कसं पटवून द्यायचं, असा प्रश्न त्याला पडला होता.

आईच्च्या दडपणानी तो मनातले विचार बोलू शकला नाही; आणि शेवटी त्याला जी भीती वाटत होती तेच घडलं. गोष्टी घटस्फोटापर्यंत येऊन ठेपल्या. दोन्ही बाजूंना एकत्र येणं नकोच होतं, त्यामुळे दोन्हीही पक्ष अटीतटीनी केस चालवत होते. पौर्णिमा तर झाल्या प्रकारानी विटली होती; आणि आईच्च्या मनाविरूध्द पौर्णिमेला परत घरी आणण्याची ताकद चैतन्यजवळ नव्हती. थोड्याच दिवसात घटस्फोट झालाही. चैतन्य अगदी निराश होऊन गेला. त्याचं पौर्णिमेवर फार प्रेम होतं. नाही म्हटलं तरी दहा वर्षांचा सहवास. पौर्णिमा होतीही तशीच. सुंदर तरीही अगदी पौर्णिमेच्च्या चांदण्यासारखी शीतल.

चिरेबंदी इमारतीचा एक चिरा निखळला होता पण अवंतिकाबाईंनी हे काही आपल्यामुळे घडलं, असं मनाला लावून घेतलं नाही. आज घटस्फोट झाला की उद्या चैतन्यचं लग्नं होईल असं त्यांना वाटायचं. पण प्रत्यक्षात तसं घडलं नाही. चैतन्य एकटा पडला. ही अवंतिकाबाईंसाठी नियतीनी दिलेली दुसरी धोक्याची घंटा होती; पण त्यानी त्यांच्च्या आत्म - सन्मानाला कुठलाही धक्का पोहोचला नाही. स्वत:च्च्या “ मी “ पणाच्च्या धुंदीत त्या खूषच होत्या. हा त्यांना पौर्णिमेचा पराभव वाटला होता. वर्षभरात

पौर्णिमेचं दुसरं लग्नं झालं सुद्धा. हा आपलाच पराभव आहे हे त्यांच्या गावीही नव्हतं. मनानी दुबळा असलेला चैतन्य आणखीनच खचला.

घटस्फोट आणि कंपनीतला संप दोन्हींची वेळ एकच आली. कारखान्यात संप झालाच. उत्पादन बंद पडलं. दोन्ही भावांनी आपापल्यापरीनं प्रयत्नांची पराकाष्ठा केली. पण त्या असंतोषावर नियंत्रण मिळवणं त्यांना शक्यं झालं नाही. परिणाम व्हायचा तोच झाला, कारखाना बंद पडला. यावेळीही हे सगळं का घडतं आहे, याचा वस्तुनिष्ठ विचार न करता, अवन्तिकाबाईंनी वेगळाच सूर लावला. त्या म्हणायला लागल्या की मधुराणी घरात आली आणि त्यांनतर सगळं वाईटच घडायला सुरवात झाली.

लग्नानंतर १० / १२ वर्षांनी मधुराणीच्या पायगुणाची चर्चा सुरु केली त्यांनी. दुसऱ्यांना अशी दूषणं देऊन स्वत:चं अपयश लपवताही येत नाही आणि ते नाहीसंही होत नाही, हे लक्षात येउन सुद्धा, मकरंद मधुराणीला यातून वाचवू शकला नाही. घरात सतत तीच चर्चा चालायची. ते ऐकून ऐकून मधुराणी सैरभैर झाली. मकरंदमध्ये आपल्याला वाचवण्याचं बळ नाही हे ती जाणून होती.

मग बघणार तरी कोणाकडे! बळवंतराव तर असहाय होऊन पडले होते. कोणी त्यांचा अपमान करत नव्हतं; पण कोणी त्यांना काही विचारतही नव्हतं. अधु होऊन बिछान्याला खिळलेले बळवंतराव आढ्याकडे नजर लाऊन बसलेले असत. मधुराणीला सगळयांबद्दलच प्रेम होतं; आपण अजूनही या परिस्थितीवर मात करून, सगळं मार्गी लाऊ शकू असा आत्मविश्वास तिला होता. पण घरातल्या माणसांना विनाशच हवा होता. तिनीही आपल्या माहेरचा रस्ता धरला. रीतसर घटस्फोट घेतला. तिला तिच्या मुलांचा ताबा न देण्यातच अवंतिकाबाईंनी स्वत:ची जीत मानली.

"या सगळया अवनतीला कळत नकळत आपणच जबाबदार आहोत, आपलंच काहीतरी घोर चुकलं आहे, आई म्हणून - कुटुंबप्रमुख म्हणून आपण कुठेतरी कमी पडतो आहोत," असले विचार त्यांच्या मनात कधी आलेच नाहीत. सगळया चुकांचा भार नशिबावर आणि सुनांच्या पायगुणावर टाकून त्यांनी स्वत:ला कमलदलाप्रमाणे सगळयातून अलिप्त ठेवलं. स्वत:चं मोठेपण त्यांनी स्वत:जवळ तरी टिकवून ठेवलं होतं. मग जग काही का म्हणेना!

सुना तर निघून गेल्या!

आता दोन अपयशी मुलं, दोन आईविना पोरकी नातवंड, अंथरुणाला खिळलेले बळवंतराव आणि या साऱ्यांना आत्मविश्वासानी सांभाळणाऱ्या अवंतिकाबाई असा नवाच संसार सुरु झाला. मकरंद आणि चैतन्य आईच्याच पठडीत वाढलेले. ते आपलं अपयश मानायला अजिबात तयार नव्हते. सगळा दोष इतरांना आणि नशिबाला देऊन ते दोघंही निर्विकारपणे घरात स्वस्थ बसले होते. पण मन कुठे स्वस्थ बसू देतं! झाल्या प्रकारांनी मनोमन ते ही हबकून गेले होते. मनाची कुतरओढ चालूच होती. कुठेतरी आपल्या बायकांची आठवण मन पोखरून टाकत होती; आणि हे मान्य तर करायचंच नव्हतं. या कुतरओढीपासून वाचायला दारूसारखा उपाय उपलब्ध होताच की! नि पैसाही होता हवी तितकी प्यायला. दिवसरात्र दारू जवळ करून, ते दोघंही आपलं कसं काही चुकलं नाही याची चर्चा करीत बसत. आई होतीच जवळ आपल्या बछड्यांची पाठ थोपटायला. कारखाना बंद पडला या अपयशानी निराश झालेल्या मकरंद आणि चैतन्य दोघांनीही २ / ४ वर्षात मृत्यूला आपलंसं केलं.

मधली एक पिढीच गारद झाली. दोन शाळकरी मुलं, असून नसून सारखेच असलेले बलवन्तराव आणि स्वत: अवंतिकाबाई,

असा संसाराचा नवाच सारीपाट अवंतिकाबाईंनी मांडला. त्या नातवंडांचं करण्यात रंगून गेल्या.

मुलांना वाढवतांना झालेल्या चुका नकळत टाळत अवंतिकाबाई नातवंड घडवत होत्या. जीवनव्यापी संकटांना तोंड देत देत त्या आपला संसार टुकीनी करीत होत्या. हळू हळू बळवंतराव सुद्धा काळाच्या पडद्याआड गेले. पण त्या कधीच डगमगल्या नाहीत. हरल्या नाहीत. त्या कधी डोळयातून टिपं गाळत बसल्या नाहीत. न त्यांना कधी कोणाकडून दूषणं ऐकून घ्यावी लागली. या सगळया गदारोळात आपलं काही चुकलंय असं त्यांना कधीही वाटलं

नाही. सगळा दोष नियतीला देत, त्या आत्मविश्वासानी परिस्थितीशी झगडत होत्या. ऊलट इतक्या म्हाताऱ्या वयात त्या नातवंडांचं चांगलं करताहेत, नि नातवंड चांगली शिकताहेत, याचं समाजात कौतुकच होत होतं.

या साऱ्या दुष्टचक्रात त्यांच्या मुलीनी मात्रं त्यांची साथ सोडली नाही. स्वत:चा संसार नि व्याप सांभाळीत तिने आईची पाठराखण केली. नातवंड शिकली नि नोकरीलाही लागली. त्यांनी त्यांच्या पसंतीनी लग्नंही केली. अनिशा आणि अमला या दोन

नातसुनांना सांभाळत अवंतिकाबाई घरातलं सगळं करत / करवून घेत होत्या. काळ पुढे धावतच होता. नातवांचं कर्तुत्व बघून अवंतिकाबाई सुखावत होत्या.

होता होता, अनिशाला - मोठया नातसुनेला वीसनख्यांच्या आजाराची बाधा झाली. पणतु-पणती येणार या कल्पनेनी अवंतिकाबाई हरखून गेल्या. अमलाला - धाकट्या सुनेला हाताशी घेऊन त्या अनिशाचे हवं - नकोचे लाड पुरवायला लागल्या. सुगरण तर त्या होत्याच. अनिशाला त्यांच्याकडून खाण्यापिण्याचे लाड करून घ्यायचा संकोच वाटायचा. पण अवंतिकाबाई मागे हटल्या नाहीत. त्यांनी तिची इतकी छान बडदास्त ठेवली होती, की एकदा अनिशाची आई म्हणाली सुध्दा त्यांना, की, “ माझ्याच्यानी सुध्दा तिची इतकी काळजी घेणं जमलं नसतं हो! आमचे नव्हते हो कोणी इतके लाड केले!”

अवंतिकाबाई नुसतं हसल्या. त्यांना म्हणाल्या तुम्हीही या चार दिवस इकडे राह्यला, आपण दोघी मिळून तिची हौस पुरवू या. विहीणबाईंना कोण अप्रूप वाटलं लेकीच्या आजेसासूचं. तिसऱ्या महिन्यात चोरचोळी झाली; सातव्यात त्यांनी मोठ्या दणक्यात तिचं

डोहाळेजेवण केलं, नि मग तिला माहेरी पाठवलं. जातांना तिची कशी नि किती काळजी घ्यायची हे दोघींनाही पढवायला त्या विसरल्या नाहीत. अनिशाच्या आईला तर त्यांचं कौतुकच वाटलं.

नऊ महिने सरले आणि अवंतिकाबाईंची पणजीपदावर बढती झाली. पणतु झाला म्हणून हत्तीवरून साखर वाटायचीच बाकी ठेवली होती अवंतिकाबाईंनी. बाळाचं बारसं ठरलं. आजीचा वाढदिवस दोन्ही नातवांच्या लक्षात होताच. यंदाच त्यांच्या वयाची शताब्दी पूर्ण होणार होती. बाळाच्या बारशाच्या दिवशीच त्यांच्या शताब्दीपूर्तीचा सोहळा साजरा करायचं नातू - नातसुनांनी ठरवलं. फक्त या बेताचा पत्ता त्यांनी आजीला लागू दिला नाही. त्याबरोबर सोन्याची फुलं उधळायचा कार्यक्रमही होताच. नातवांनी आजीला छानशी साडी घेतली. पणत्वाचं नाव ठेवण्याचा मान अनिशानी आपणाहूनच पणजीबाईंना दिला. अवंतिकाबाईंनी बाळाचं नाव सुचवलं दीपंकर. अनिशानी बाळाचं नाव ठेवलं. आत्यानी झोका दूर लोटला. मग दीपंकरला पणजीबाईंच्या मांडीवर देण्यात आलं. व्याह्यांनी सोन्याची फुलं पणजीच्या डोक्यावर उधळली. त्यापाठोपाठ पांच सुवासिनींनी शंभर ज्योती लावलेल्या तबकांनी

त्यांना ओवाळलं. आता त्यांना नमस्कार करण्याकरिता जमलेल्या लोकांमध्ये अहमहमिका लागली त्यांना नमस्कार करण्याची.

वयाची शतकपूर्ती झाली. तरीही त्या ताठ होत्या. घरातलं थोडंफार कामदेखील त्या करत. नातसुनांच्या माहेरी मात्र अवंतिकाबाईंचं फारच कौतुक होतं. सुनांशी ताठरपणे वागलेल्या अवंतिकाबाई नातसुनांना अगदी लाडानी वागवत होत्या. कदाचित सुना आणि त्या स्वत:, यांच्या वयातील अंतराचा हा परिणाम असावा.

नातवंड आणि नातसुना यांनी मिळून अवंतिकाबाईंच्या “ नाबाद शतकपुर्तीच्या ” कार्यक्रमाची धमाल उडवून दिली. अवंतिकाबाईंना अगदी कृतकृत्य झाल्यासारखं वाटलं. स्वत:च्या सुना सांभाळता आल्या नसल्या, तरी नातसुनांना हाताशी वागवत अवन्तिकाबाईंनी पाच सात वर्ष तरी संसार सांभाळलाच. एके दिवशी फार आजारी बिजारी न पडता त्यांनी मोठ्या नातवाच्या मांडीवर डोकं ठेवून या जगाचा निरोप घेतला. समाजानीही त्याच्या कर्तुत्वाची पावती दिली. मला वाटलं, -

‘ नियतीनी त्यांना नमविण्याचे आटोकाट प्रयत्न केले; पण शेवटी अवंतिकाबाईंनीच नियतीला नमवलं! ’

# निरपराध

*फार वर्षांपूर्वी Time या magazine मधली एक बातमी वाचल्यावर, त्यावर आधारित ही गोष्टं लिहिली आहे.*

गार्बा एकटक दूरवर नजर लावून बसली होती. अलीकडे तिला तो छंदच जडला होता. जणु काही क्षितिजापलीकडे नजर लावून, ती आपल्या मुलांचा शोध घेत होती. बघता बघता तिचा श्वास जड झाला, छाती भरून आली, आपण उभं राहू शकू, याची तिला खात्री वाटेना. म्हणून तिने जवळच्या खांबाचा आधार घेतला. समोरचं दृश्य न पाहता आपण बाल्कनीतून घरात निघून जावं, अशी आत्यंतिक उर्मी तिच्या मनात दाटून आली. पण तिच्या पायात जणू मणामणांच्या बेड्या अडकवून ठेवल्या होत्या. ती होती तशीच, तिथेच निश्चल खिळून राहिली, मनाच्या अनाकलनीय अवस्थेत.

रस्त्यावरून पोलिसांच्या मागून एक लहानगा मुलगा, पाय ओढत ओढत चालला होता. तिच्या आर्चीसच्याच

वयाचा असेल तो. पण हे काय? त्याची बहीण कुठे आहे? मोठ्या मोठ्या डोळ्यांची, ओठांचा चंबू करून हट्ट; गार्बाचं

मातृहृदय एकदम पिळवटून निघालं. ती विलाप करू लागली; “ आर्चीस, कुठे आहे माझा अर्चिस? कुठे आहे माझी निर्व्याज पोर जेसिका? ज्यो - ज्यो कुठे आहेत रे माझी बाळं? ज्यो तिच्या पाठीशीच उभा होता. तिचं बोलणं ऐकून, तो हतबुद्ध झाला. आता काय बोलावं, हे त्याला समजेना! खरंतर त्याच्याजवळ तिच्या कुठल्याही ही प्रश्नाचं उत्तर नव्हतं. आता गार्बाला जणू या जगाचं भानच राहिलं नव्हतं. आत्यंतिक दुःखांनी, तिचा चेहरा पिळवटला, तिच्या हातांवर तिचा ताबा राहिला नाही. खांबाचा आधार हातातून सुटला. डोळ्यांपुढे अंधेरी आली. गार्बा कशीबशी मागे भिंतीला टेकली आणि तिची शुद्ध हरपली.

हे सगळं आता नेहमीचंच झालं होतं! ज्योनी तिला कवेत घेतलं. पण गार्बा - आता गार्बा राहिली नव्हती. आता ती होती फक्त तिच्या बाळांची आई; जी बाळं गेल्या दोन वर्षात तिने पाहिली सुद्धा नव्हती. ज्योनी एकदा गार्बाकडे पाहिलं, तेवढ्यात त्याची नजर रस्त्याकडे वळली. त्यानेही तो लहानगा, व्यवस्थित पोशाख केलेला, पाय ओढत ओढत चाललेला मुलगा पाहिला होता. गार्बाच्या अशा अवस्थेचं कारण त्याला कळलं. त्यालाही त्या रस्त्यावरच्या मुलात, त्याचा अर्चिस दिसत होता. त्या मुलाचा चेहरा केविलवाणा दिसत होता. ज्योला संभ्रम झाला. त्याला वाटलं, असंच धावत जावं आणि कवटाळावं त्या सानुकल्याला.

पण दोन्ही अर्थांनी ते शक्य नव्हतं. एकतर गार्बाला अशा अवस्थेत सोडून जाणं शक्य नव्हतं; आणि दुसरं म्हणजे, तो मुलाजवळ पोहोचण्या आधीच पोलिस त्यालाही पकडून, आपल्याबरोबर घेऊन गेले असते. मग गार्बाला कोणी सांभाळलं असतं?

आता तेच दोघं एकमेकांचा आधार होते. तिच्या आणि त्याच्या हृदयीच्या वेदना एक झाल्या होत्या. गार्बा आणि ज्यो ही आता वेगवेगळी व्यक्तिमत्वं नव्हतीच जणु. त्यानी हळुवारपणानी गार्बाला उचललं आणि आत बेडवर नेऊन ठेवलं. थोडं पाणी आणून तिच्या डोळयांना लावलं. त्याचा योग्य तो परिणाम झाला. गार्बानि आता डोळे उघडले. समोर ज्योला पाहताच, मनाचा आवेग सांभाळणं तिला शक्य झालं नाही.

“ ज्यो - ज्यो मी आता पहिला रे त्याला! “ गार्बा नकळत उद्गारली. ज्यो आवेगानी पुढे झाला. त्यानं गार्बाला आपल्या बाहुपाशात घट्ट धरली. तिचं मस्तक त्याच्या छातीवर विसावलं. ज्यो पुढे म्हणाला, “ डिअर गार्बा मी ही त्याला पाहिलं. चल, तुला जर बरं वाटत असेल तर आपण दोघंही बाल्कनीत जाऊन त्याला बघूया.

सोसवत नव्हतं तरी गार्बाच्या मनाचीही तीच मागणी होती. तिनं हलकेच हालचाल केली. ज्योनी जवळ जवळ उचलूनच तिला

बाहेर आणली. दोघंही हातात हात गुंफून अपेक्षेने रस्त्याकडे पाहू लागली. पण आता रस्ता रिकामाच होता. गेला होता तो गोजिरवाणा मुलगा त्यांच्या आर्चिससारखा, अज्ञाताच्या वाटेवरून. दूरवर पसरलेला रस्ता मात्र आता भयाण वाटत होता. वळणावळणांनी बनलेला रस्ता नव्हता तो. त्याला एकच मार्ग होता. सरळ पुढे जाणं. तो आजूबाजूला बघू शकत नव्हता. ते जगच त्याला माहीत नव्हतं. जणू हिरावला गेलेल्या अर्चिस आणि जेसिकाच्या भवितव्यतेचं प्रतिकच होता तो रस्ता. ते दोघंही आता असेच जाणार होते दुसऱ्यांनी आखून दिलेल्या मार्गावरून. वाटलं, तरी आता त्यांना कुठल्याही वळणावर वळायला मिळणार नव्हतं. जाणार होते आता ते विशिष्ठ, आखीव रेखीव मार्गावरून, विशिष्ठ अशा ध्येयाप्रत; की हे ध्येय आपण का गाठलं, हे ही त्यांना कधी उलगडणार नव्हतं.

ज्योनी गार्बाला जवळ ओढली. पुरुष होता म्हणून काय त्याच्या मनाला कमी वेदना होत होती? आर्चिस त्याच्या हृदयीचा ठेवा होता. अन् जेसिका - जेसिका म्हणजे त्याला पडलेलं एक सुखस्वप्नच, की जे केवळ दैवी होतं असं ज्याला वाटायचं. रुसव्या चेहेऱ्यानं आपले चिमुकले हात त्याच्या गळयात टाकून जेसिका त्याला म्हणायची, “ डॅड किस मी. ” मग ज्यो हळुच तिची पापी घ्यायचा. मग ती तिचे गोबरे गोबरे गाल फुगवून म्हणायची, “

अर्चिसच तुला अधिक आवडतो, हो नं? पण डॅड, मीही तुझ्यावर त्याच्या इतकंच प्रेम करते हं! ” ह्या तिच्या लाडिक रुसव्याला उत्तर द्यायचं भान मात्र ज्योला राहायचं नाही. तो तिच्या गोडव्यात हरवून जायचा.

तो कामावरून परत आल्यावरचा हा त्यांचा रोजचा संवाद होता. पण रोजचा असला तरी त्यात रोजचं नावीन्य होतं. हे तिचे बोबडे बोल ऐकले, की ज्यो त्यात हरवून जात होता. तो फक्त तिला आणखी जवळ घ्यायचा. तिचा गाल आपल्या गालावर घाशीत, डोळे मिटून तो गार्बा आणि जेसिका यांच्यातलं अधिक गोड सुखस्वप्नं कोणतं? असा विचार करत राहायचा. पण या प्रश्नचं उत्तर, कितीही विचार केला तरी त्याला देता यायचं नाही. मग तो स्वतःलाच प्रश्न करीत असायचा की, मी असं कुठलं सत्कृत्य केलं असावं म्हणून हे देवाघरचं सुखस्वप्नं असं अलगद माझ्या ओंजळीत येऊन विसावलंय.

या क्षणी तरी त्याला गार्बाचा क्षणभर तरी विसर पडलेला असायचा. इतका तो जेसिकाच्या मोहात अडकलेला असायचा. इतका की त्याचं ‘ मी ‘ पण जेसिकाच्या लाडिक लाडिक बोलांनी विरघळून गेलेलं असायचं. गार्बा तर त्याच्या हृदयीचे देवता होती. तिच्या साथी - संगतीनंच तर तो या सुख - समाधानाचा स्वामी

झाला होता. बस्स्, आता तो तृप्त होता. त्याला आता कशाचीच ईर्षा उरली नव्हती. आणखी काही मिळवायची आशा आकांक्षा आता त्याच्या मनात राहिलीच नव्हती. जे मिळवायचं होतं, ते देवानी त्याला मुक्त हस्तानी आधीच बहाल केलं होतं. अतीव सुखाच्या जाणिवेनी त्यानी डोळे मिटले आणि हातातल्या व्यक्तीलाच जवळ ओढलं. अरेच्चा! ही तर जेसिका नव्हती. ही गार्बा होती. मग जेसिका कुठे आहे? रोज मी घरी आलो की, माझ्या मागे मागे फिरणारी जेसिका आज कुठे आहे? ती आज आपला नेम विसरली कशी? डोळे किलकिले करून त्याने पाहिलं आणि तो भानावर आला. त्याला वस्तुस्थितीची जाणीव झाली. त्यांनी गार्बाकडे पाहून किंचितसं स्मितहास्य केलं. गार्बाही आता भानावर आली होती. तिनंही त्याच्या हास्याला प्रतिसाद दिला.

ज्यो घरी आला की, संधिप्रकाश दाटून यायच्या वेळेला ती दोघंही बाल्कनीतल्या खुर्चीवर टेकायची. तो एकमार्गी सरळ रस्ता पहिला की त्यांच्या मनात आर्चिस आणि जेसिकाची आठवण उफाळून यायची. गार्बा म्हणायची, “ ज्यो, कुठे असेल रे आपला आर्चिस? आणि जेसिका आता कोणाच्या मांडीवर बसत असेल रे?जणू ज्योच्या मनातल्या विचारांची प्रतिबिंबच गार्बाच्या शब्दात उतरलेलं असायचं. तो काहीच उत्तर देत नसे. मग गार्बाच पुढे म्हणायची, “ ज्यो ज्या दैवगतीनं आणि दुष्ट शक्तींनी आम्हा माय-

लेकरांची ताटातूट केली आहे, त्याच दैवगतीनी जर आपण पुन्हा एकत्र आलो तर माझी बाळं ओळखतील का रे मला? हा तिचा प्रश्न म्हणजे जणु, तिचं स्वगतंच असायचं. कारण ह्या प्रश्नाचं उत्तर ज्यो कधीच देत नसे. कारण हा प्रश्नचमुळी बिनउत्तराचा होता. आपली मुलं आणि आपण आता कधीच एकत्र येणार नाही आहोत हे तो जाणून होता. तो नुसताच तिचा हात हातात घ्यायचा. अंतरीच्या वेदनेतून उठणाऱ्या त्या प्रश्न तरंगाचं, स्पर्शाच्या मूक भाषेत उत्तर देण्याचा प्रयत्न जणू ज्यो करीत असे.

बरोबर दोन वर्षांपूर्वी एका सुखद संध्याकाळी ती चौघेजण बागेत जाणार होती, रंगीत कारंजी पाहायला. आर्चिस अगदी शहाणा आणि टापटिपीचा होता. त्याला ती कारंजी पाहायला फार आवडायची. ती कारंजी पाहून तो प्रमुदित व्हायचा. तो म्हणायचं, “ ही कारंजी नव्हतंच; हे आहेत पऱ्यांच्या राज्यात नेणारे झोपाळे. ” खरंतर त्याच हे असलं बोलणं ज्योला मनापासून मुळीच आवडायचं नाही. त्याला वाटायचं की आर्चिसनी जरा दंगा करावा. उड्या माराव्यात, हट्ट करावेत; या कारंज्याच्या पाण्यात भिजून त्यानी कपडे ओले करावेत; पण हे असलं बोलू नये. हे काय लहान मुलाचं बोलणं झालं? पण सरळ मनाचा आर्चिस आईच्या शिस्तीत वाढला होता. शहाण्या मुलांनी कसं वागायचं असतं हे त्याला

चांगलंच माहीत असायचं. तो शहाणपणाची कक्षा कधीच ओलांडायचा नाही.

पण त्या रंगीत कारंज्यांच्या जवळ आल्यावर जेसिकाच्या अवखळपणाला मात्र भरतीचा ओघ यायचा. तिला सांभाळता सांभाळता गार्बाचा व्यवस्थितपणा आणि टापटीप गळून पडायची. पण जेसीका काही दमायची नाही. कारंजी पाहून झाल्यावर, जेसिकानी बोटिंगचा हट्ट धरला. बोटिंग करता करता आपली मान ज्योच्या खांद्यावर विसावत गार्बा म्हणाली, “ ज्यो, या बोटीतून आपण असेच पुढे जाऊया अज्ञातापर्यंत. जिथे तुझ्या माझ्याशिवाय, आपल्या बाळांशिवाय कोणीच असणार नाही. होऊ दे हा क्षण असाच स्थीर. विसावू दे मला तुझ्या खांद्यावर अशीच चिरंतन काळापर्यंत! ज्यो, तू नाही ना रे मला सोडून जाणार कधी? गार्बाच्या भावनावेगाने ज्योही भारावला. दोन्ही मुलांसहित गार्बाला आपल्या कवेत घेत तो म्हणाला, “ गार्बा, माझी गार्बा, माझ्यासारखा सुखी मीच आहे. माझ्या हृदयीची आणि संसाराची स्वामिनी तूच आहेस. काळही आपल्याला एकमेकांपासून दूर करू शकणार नाही. ” हे त्याचे प्रेमाचे बोल ऐकून गार्बा अगदी धन्य धन्य झाली. सुखाच्या लाटांवर तरंगत आणि झोपाळलेल्या जेसिकाला सांभाळत ती दोघे घरी आली.

कोणत्या भयाण आणि एकाकी संकटाची सुरवात आपली वाट पाहत आहे, याची त्यांना त्या क्षणी तरी मुळीही जाणीव नव्हती. त्या संध्याकाळी ज्यो नि गार्बा धरतीवर नव्हतीच जणू! घरी पोहोचता पोहोचता, आपल्या घराजवळ दोन - चार पोलीस दिसल्याबरोबर ज्योच्या मनात चर्र झालं आणि त्याची भीती खरीही ठरली. घराच्या जवळ पोहोचल्याबरोबर त्या पोलिसांनी त्यांना चहूबाजूंनी घेरालंच जणु! त्यांच्या सुखी - उबदार घरट्यात त्यांना पाऊलही न टाकू देता, पोलीस जीपमध्ये बसवून ते त्यांना चेकपोस्टवर घेऊन गेले. गाडीत आर्चिस भिजलेल्या पाखरागत केविलवाणा होऊन बापाला चिकटून बसला होता. अन् गार्बाच्या खांद्यावर विसावलेल्या जेसिकाला तर पऱ्यांची स्वप्नं पडत असावीत. आईच्या छातीला बिलगून निर्धास्त मनानी स्वप्नं पाहत जेसिका गालातल्या गालात हसत होती.

गार्बाची तर वाचाच बंद झाली होती. हे सगळं काय आणि कशासाठी चाललं आहे हेच तिला उलगडत नव्हतं. सुखाच्या शिखरावरून अंध:कराच्या खोल गर्तेत आपण कोसळू पाहतो आहोत, याची अंधुकशी जाणीव तिच्या मनाला व्हायला लागली होती. ज्योनीही गार्बाचा हात घट्ट धरून ठेवला होता. येणाऱ्या संकटापासून जणु काय गार्बा त्याचं रक्षण करणार होती. काही क्षणांपूर्वी आपण गार्बाला दिलेलं अभिवचन किती वैयर्थिक होतं,

हे तो आठवत होता. तिची आणि त्याची ताटातूट व्हायला आता अगदी काही क्षणांचाच अवधी राहिला होता, याची चाहूल त्याच्या मनाला लागली होती. पण असं काहीतरी नकोसं आणि भयाण, एक ना एक दिवस घडणारच आहे, अशी अस्पष्टशी भीती फार पूर्वीपासून त्याचा मनात घर करून बसली होती.

त्याचा अमेरिकेला पळून गेलेला कॉम्रेड मित्र, की जो आता पूर्ण स्वातंत्र्याचा अनुभव घेत होता, तो त्यांना चोरून भेटायला आला होता. आणि इथल्या कडक पोलीस बंदोबस्ताला हुलकावणी देत, सुखरूपपणे परतही गेला होता. अशा ठिकाणी की, ‘ जिथे होती फक्त प्रीती, नव्हती प्रिय जनांना मुकण्याची भीती. नव्हतं करीत कुणी कुणाचा पाठलाग, जगू शकत होती लोकं, आपलं जीवन हवं तसं बेलगाम.’ त्यांची ही चोरटी भेटही यशस्वी झाली होती. तरीही ती कोणाच्याच निरीक्षणात आली नसेल याची ज्योला खात्री नव्हती. मित्राचा पाहुणचार,करतांना निदान मित्र तरी सुखी झाला, या विचारांनी ज्योचं मन समाधानानी भरून येत होतं. परंतु त्याच वेळी या भेटीची नोंद नको त्या ठिकाणी घेतली गेली असली पाहिजे; याची त्याला आता खात्रीच वाटत होती. त्याच्या हृदयाचा थरकाप होत होता. त्याची भीती खरी ठरली होती.

खरंतर त्यांच्या भेटीत मित्र भेटीशिवाय इतर काही नव्हतं. मित्र म्हणून त्यानेही हा देश सोडून अमेरिकेला चलावं असा प्रेमाचा आग्रह त्याच्या मित्रानी - फ्रेडरिकनी केला होता. पण ही नुसती सूचना होती. कुठलंही कट - कारस्थान त्याच्यामागे नव्हतं. संसारात बुडून गेलेल्या ज्योला, आपल्या प्रियजनांसहित हा देश सोडून जाणं किती अवघड आहे याची त्या दोघांनाही जाणीव होती. तरीही मित्र प्रेमामुळे फ्रेडरिकनी त्याला आग्रह केला होता. एव्हढंच - एवढंच निमित्त ज्योला या संकटात ओढायला पुरेसं होतं.

पोलिसांनी त्यांना पकडून नेल्यावर जवळ जवळ दोन तास एका खोलीत एकटंच बसवून ठेवलं होतं. खोलीबाहेर मात्र एक गार्ड उभा होता. ज्यो आणि गार्बा तर अगदी गलितगात्र झाली होती. कधी नव्हेत ते आज आई-वडिलांच्या मांडीची ऊब मिळाल्यामुळे, दोन्ही मुलं त्यांच्या मांडीवर बिनघोर झोपून गेली होती. आता आपल्यासमोर काय वाढून ठेवलं आहे या विचारांनी त्यांच्या तोंडून एक शब्दही फुटत नव्हता. विचारांनी त्यांचं डोकं फुटायची वेळ आली होती. खुप वाट पाहायला लावून अखेरीस त्यांना एका दुसऱ्या खोलीत नेण्यात आलं. अशी खोली की, त्या खोलीत प्रवेश केल्या केल्या मनात तिरस्काराशिवाय कोणतीही भावना निर्माण होऊ नये. आत प्रवेश केल्या बरोबर त्यांनी ज्योच्या कडेवर निजलेल्या अर्चिसच्या दंडाला धरून खाली ओढलं. " ममी

i want more, असं काहीस बडबडत आर्चिस जागा झाला. त्या अधिकाऱ्याकडे आर्चिसनी पाहिलं मात्र आणि आर्चिसच्या तोंडातले शब्द पुढे उमटलेच नाहीत. त्या अधिकाऱ्यानं आर्चिसला तसंच ओढत दुसऱ्या अधिकाऱ्याच्या स्वाधीन केलं.

दुसरा अधिकारी आर्चिसला फरपटत दुसऱ्या खोलीत घेऊन गेला. आर्चिस, आर्चिस असं म्हणत गार्बाही त्यांच्या मागे धावली. त्यांच्या शेजारीच आणख चार - पाच सशस्त्र अधीकारी सहजच उभं राहावं तसे उभे होते.

त्यांच्या नजरेत उद्धटपणाशिवाय दुसरी कुठलीच भावना नव्हती. त्यांच्या उद्धट - अरेरावीनं उभे राहण्याच्या पद्धतीवरून, ते वाटेल ती गोष्टं करायला मागेपुढे पाहणार नाहीत हेच लक्षात येत होतं. त्यातला एक अधिकारी जोरात जरबेच्या आवाजात गार्बावर ओरडला, “ स्टॉप, ”, गार्बाचे पाय जागीच खिळले. त्या काही क्षणातच आर्चिस त्यांच्या दृष्टीआड झाला होता. भितीनी त्यांच्या मनांचा कब्जा घेतला होता. ज्यो भितीनी जागीच खिळून राहिला होता तरी त्याचं मन आर्चीसकडे झेपावलं होतं. पराधीन झाला होता तो.

आर्चिसला सोडून आलेल्या अधिकाऱ्यानं आल्याबरोबर गार्बाचे दोन्ही हात उंच धरले, अन् दुसऱ्यानं तिच्या मांडीवर

झोपलेल्या जेसिकाला अलगद उचललं अन् तो दृष्टीआड झाला. जेसिकाला पाहिल्यावर तिच्याशी धसमुसळेपणानी वागणं त्याला शक्यच झालं नसावं. आता मात्र गार्बा थिजून गेली. तिची नजर विझुन गेली. काही क्षणातच तो आत गेलेला अधिकारी परत आला आणि त्यानी बरोबर आणलेली कागदपत्रं त्यांच्या हवाली केली. ते होते अमेरिकेत जाण्याकरता लागणारे परवाने आणि तिकिटं. ज्यो सुन्न मनानी त्याकडे पाहत होता. चेहेरा हातात लपवीत त्याने मन खाली घातली.

तो गार्बाला उद्देशून म्हणाला, बघ आम्ही तुला एक संधी देत आहोत. ठरव तुझं तूच काय करायचं ते. पण जर तू नकार दिलास तर तुम्हा सर्वांचं काय करायचं ते आम्ही ठरवू; मग मात्र आमच्या निर्णयात कोणीही बदल करू शकणार नाही. तुझी इच्छा असल्यास तू तुझ्या दोन्ही मुलांना घेऊन हा देश सोडून अमेरिकेला निघून जा. तुझा नवरा हा देश सोडून जाऊ शकणार नाही; आणि यापुढे तुम्हा दोघांना एकत्रही राहता येणार नाही. त्याच्या बोलण्यात कितपत सत्यता होती देवाचं जाणे. कदाचित त्याने टाकलेला हा काहीतरी नवा डाव असावा.

ज्यो व्याकुळ नजरेनी गार्बाला सुचवत होता, हो म्हण, गार्बा हो म्हण. होऊ दे माझं काहीही, पण निदान तू आणि मुलं तरी सुखात

राहाल नं! चट्कन येऊ दे होकार तुझ्या तोंडून. पण मुलांच्या मायेनी भारावलेल्या गार्बाचं हृदय ज्योच्या प्रेमाच्या रेशमी बंधांनी जखडलेलं होतं. आपण हो म्हटल्यास आपल्याला आणि ज्योला अलग करतील. मुलांना तर आधीच घेऊन गेले आहेत. इथे एकत्र राहिलो तर येणाऱ्या आपत्तींना आम्ही कसबसं तरी तोंड देऊ शकू. कधी ना कधी आमची मुलं आम्हाला भेटतील, अशी आशा तरी राहील.

“ हो, झाला माझा निर्णय; मी नाही सोडणार माझ्या ज्योला. “ गार्बा म्हणाली.

तिचं म्हणणं ऐकल्यावरही, तो अधिकारी सकम्प स्वरात म्हणाला, “ हे स्त्रिये, आजवर कुणालाही न दिली गेलेली संधी, मी तुला पुनःश्च एकवार देतो आहे. अजूनही तू विचार कर. तुझ्या या गोजिरवाण्या मुलांकडे पाहून माझं मन द्रवतं आहे, म्हणून मी ही संधी तुला देतो आहे. त्याच्या म्हणण्यावर कोणाचाच विश्वास बसला नसता. मुलांची आणि आपली ताटातूट झालीच आहे; आता आपण हो म्हणालो, तर ज्योलाही गमावून बसू. हा विचार तिची पाठ सोडत नव्हता. तिने त्या अधिकाऱ्याकडे मन उंचावून सुद्धा बघितलं नाही. ती तशीच बसून राहिली, ज्योचा हात हातात धरून. तो अधिकारी काय समजायचं ते समजला. आता पुढे

कराव्या लागणाऱ्या क्रूर कर्माच्या जाणिवेनं तोही जड पावलांनी चालता झाला. गार्बा ज्योला बिलगून बसली. जणु त्यामुळे तिला कोणीही त्याच्या पासून अलग करू शकणार नव्हतं.

यानंतर किती वेळ गेला देवचं जाणे! त्यांनी झोपलेल्या मुलांना त्यांच्याजवळ आणून सोडलं . ही त्या अधिकाऱ्याची कृपाच म्हणायची. नानाविध प्रश्नांचा भडीमार त्यांच्यावर करून शेवटी ते अधिकारी तिथून निघून गेले. झोपाळलेला आर्चिस भिंतीलगतच्या बाकावर अंगाचं मुटकुळं करून झोपला होता. त्याला ज्योनी आपल्या कुशीत घेतलं. जेसिका गार्बाच्या मांडीवर झोपली होती. गार्बाची मांडी अवघडली होती. पण जेसिकाला स्वतःपासून दूर करण्याचा धीर तिला होत नव्हता. न जाणो, कोणीतरी येऊन तिला घेऊन जायचं. ती तशीच अवघडून बसली होती.

ज्याअर्थी मुलांना आपल्याजवळ आणून दिलं, त्याअर्थी सकाळ झाल्यावर आपल्याला सोडून देतील अशी आशा गार्बाला वाटायला लागली होती. पण ज्यो हतबल झाला होता. त्याचा चेहेरा भावनाहीन झाला होता. जणू त्याच्या शेजारी त्याचे कोणी प्रियजन नव्हतेच. इतका तो एकाकी भासत होता. या प्रसंगातून आपली सुटका नाही, गार्बा व आपली बच्छडी यांना आपल्याला

मुकावं लागणार आहे याबाबत त्याच्या मनात कोणतीही शंका नव्हती.

ती भयाण रात्र तशीच मुंगीच्या पावलांनी पुढे सरकत होती. होता होता पहाट झाली. बाहेर गेलेले अधिकारी पुन्हा आत आले. आल्याआल्या त्यांनी गार्बाला प्रश्न केला की, “ ज्योला घटस्फोट द्यायला तू तयार आहेस का? “

“ नाही, नाही हो,” गार्बा चाचरत पण निर्धारपूर्वक म्हणाली. ती भितीनी कमालीची पांढरीफटक पडली होती.

“ बघ तू जर याला सोडून द्यायला तयार असलीस, तर तुझी मुलं तुझ्याजवळ राहू शकतील. कारण याची आम्हाला खात्री नाही. हा कधी ना कधी देश सोडून जायचा विचार करणारच. “

“ नाही हो, असा विचार सुद्धा आमच्या मनात आलेला नाही. “ गार्बा

“ आम्हाला सर्व गोष्टी माहीत असतात.तुमच्या सारख्या पळपुट्या माणसांजवळ, आम्ही आमची राष्ट्रीय संपत्ती, म्हणजे तुमची मुलं, आमच्या देशाची पुढची पिढी, राहू देऊ शकत नाही. त्यांना आता आम्ही वाढवू. ” एव्हढेच शब्द तो बोलला.

दुसरा अधिकारी म्हणाला, “ तुम्हाला अनेकवार संधी देऊन सुद्धा तुम्ही आमचं ऐकलं नाहीय. शेवटी नाईलाजास्तव आम्हाला

निर्णय घ्यावा लागणार आहे. तरीही खात्री बाळगा आम्ही तुमच्या मुलांचे हाल होऊ देणार नाही. तुम्हाला मात्र आठ दिवसांच्या आत हा देश सोडून जावं लागेल. मुलं ही राष्ट्रीय संपत्ती आहेत, म्हणून त्यांच्या बाबतीत आम्ही कुठलाही धोका पत्करायला तयार नाही. आम्ही त्यांना चांगलं वाढवू आणि त्यांच्या मनात राष्ट्रप्रेम निर्माण करू."


संपलं. या एवढ्या शब्दांनी गार्बाचं सुखस्वप्नं हिरावून घेतलं. तिचे पंचप्राण असलेली तिची मुलं, त्यांना हे राक्षस राष्ट्रीय संपत्ती समाजात होते. नव्हती समजत त्यांना हाडामांसाची, भावभावना असलेली माणसं! नव्हती थोडी सुद्धा माणुसकी त्यांच्यात. ज्यो आणि गार्बा, यांच्यात व त्यांच्या मुलांमध्ये त्यांनी असा पोलादी पडदा उभा केला की त्या पडद्याआड आपल्या मुलांचं काय झालं,हे ज्यो आणि गार्बाला कधीच समजू शकलं नाही.

**अरुंधती बापट यांची**

**प्रकाशित पुस्तके.**

**कव्हरवर क्लिक**

**करताच उघडतील.**






**ई साहित्य प्रतिष्ठानचे हे <u>तेरावे</u> वर्ष.**
**अरुंधती बापट यांचे हे तिसरं पुस्तक.**

अरुंधती बापट यांना साहित्याचं बाळकडू घरातूनच मिळालं आणि रक्तात आलं. त्यामुळे लेखन करणं हा त्यांचा "स्व"भाव आहे. आणि ते लेखन त्या स्वांतःसुखाय करतात. ते प्रसिद्ध व्हावे यासाठी प्रयत्न करण्याचा त्यांचा "स्व"भाव नाही. आणि त्यातून काही मिळावे ही अपेक्षा अजिबात नाही. पैसा, नाव, पुरस्कार काहीच. त्यांच्या लेखनात कोणाला काही शिकवण्याचा आव नसतो. पण तरीही त्यातून संस्कारांची पेरणी व्हायची ती होतेच. त्यांच्या लेखणीचे हेच वैशिष्ट्य आहे. अरुंधती बापट यांच्यासारखे ज्येष्ठ लेखक आपली पुस्तके ई साहित्यच्या माध्यमातून जगभरातील मराठी वाचकांना विनामूल्य देतात. असे लेखक ज्यांना लेखन हीच भक्ती असते. आणि त्यातून कसलीही अभिलाषा नसते.

मराठी भाषेच्या सुदैवाने गेली दोन हजार वर्षे कवीराज नरेंद्र, संत ज्ञानेश्वर, संत तुकारामांपासून ही परंपरा सुरू आहे. अखंड. अजरामर. म्हणून तर दिनानाथ मनोहर(४ पुस्तके), शंभू गणपुले(९पुस्तके), डॉ. मुरलीधर जावडेकर(९), डॉ. वसंत बागुल (१९), शुभांगी पासेबंद(९), अविनाश नगरकर(४), डॉ. स्मिता दामले(८), डॉ. नितीन मोरे (२८), अनील वाकणकर (९), फ्रान्सिस आल्मेडा(२), मधुकर सोनावणे(२), अनंत पावसकर(४), मधू शिरगांवकर (६), अशोक कोठारे (५० खंडांचे

महाभारत), श्री. विजय पांढरे (ज्ञानेश्वरी भावार्थ), मोहन मद्वण्णा (जागतिक कीर्तीचे वैज्ञानिक), संगीता जोशी (आद्य गझलकारा, १७ पुस्तके), विनीता देशपांडे (७) उल्हास हरी जोशी(७), नंदिनी देशमुख (५), डॉ. सुजाता चव्हाण (८), डॉ. वृषाली जोशी(२०), डॉ. निर्मलकुमार फडकुले (१९), CA पुनम संगवी(६), डॉ. नंदिनी धारगळकर (८), अंकुश शिंगाडे(९), आनंद देशपांडे(३), नीलिमा कुलकर्णी (२), अनामिका बोरकर (३), अरुण फडके(३) स्वाती पाचपांडे(२), साहेबराव जवंजाळ (२), अरुण वि. देशपांडे(५), दिगंबर आळशी, प्रा. लक्ष्मण भोळे, अरुंधती बापट(३) अरुण कुळकर्णी(८), मधुकर सोनवणे(३) असे ज्येष्ठ व अनुभवी लेखक ई साहित्यच्या माध्यमातून आपली पुस्तके लाखो लोकांपर्यंत विनामूल्य पोहोचवतात.

अशा साहित्यमूर्तींच्या त्यागातूनच एक दिवस मराठीचा साहित्य वृक्ष जागतिक पटलावर आपली ध्वजा फडकवील याची आम्हाला खात्री आहे. यात ई साहित्य प्रतिष्ठान एकटे नाही. ही एक मोठी चळवळ आहे. अनेक नवनवीन व्यासपीठे उभी रहात आहेत. त्या त्या व्यासपीठांतून नवनवीन लेखक उदयाला येत आहेत. आणि या सर्वांचा सामूहिक स्वर गगनाला भिडून म्हणतो आहे.

आणि ग्रंथोपजीविये। विशेषीं लोकीं ’इ’यें।

दृष्टादृष्ट विजयें। होआवे जी।